यवतमाळ दि. शुक्रवार ६ नोव्हेंबर २०२६

आजचे तापमान

कमाल	किमान
२८ से. °	२४ से. °

हवामानाचा अंदाज
थंड वातावरण

दैनिक
लोकसूत्र

वर्ष - पाचवे • अंक १७६ • किंमत ३ रु. E-mail : Loksutra@gmail.com RNI NO.MAHMAR/2022/83119

नवसंजीवन शिक्षण प्रसारक मंडळ, दारव्हा द्वारा संचालित
श्रीमती सुमित्राबाई ठाकरे कॉलेज ऑफ नर्सिंग
प्लॉट नं.पी.-३, एम.आय.डी.सी.एरिया, लोहारा, यवतमाळ
G.N.M. (3 वर्ष)
पात्रता : HSC (सायन्स, कॉमर्स, आर्ट) सायन्स विद्यार्थ्यांना प्राधान्य
A.N.M.(2 वर्ष)
पात्रता : HSC (सायन्स, कॉमर्स, आर्ट) फक्त मुलींकरिता
P.B. BSC NURSING
पात्रता : GNM
B.Sc. Nursing
4 वर्ष पदवी अभ्यासक्रम
पात्रता : HSC (सायंस) PCB ग्रुप मध्ये 45%
MH B.Sc Nursing CET
जागा : 40
ANM/GNM/B.Sc.(N)
अधिक महितीकरीता संपर्क
9561537762, 9130645861

हास्यटोला



सुरेश राऊत (सुदंश)

न्यूज Crime

दुचाकी अपघातात दोघे जखमी

यवतमाळ : कामानिमित्त आपल्या दुचाकीवरून जात असलेल्या महिलेच्या दुचाकीला समोरून येणाऱ्या दुचाकी वाहनाने धडक दिल्याने या अपघातात दोन महिला जखमी झाल्याची घटना येथील शिवाजी मैदान रस्त्यावर साडेपाच वाजता च्या दरम्यान घडली. गिलानीनगरमध्ये राहणाऱ्या मोनाली नीलेश जाधव (३८) या त्यांच्या सासूबाई शशिकला जाधव (६५) यांना एम एच २९ सिटी ५४ ४५ या क्रमांकाच्या दुचाकी वाहनाने जात असताना त्यांना विरुद्ध दिशेने येणाऱ्या शाईन क्र. एम एच २९ बीएच ९२ ९० क्रमांकाच्या वाहनाने धडक दिली. या अपघातात मोनाली जाधव आणि त्यांच्या सासू शशिकला या खाली पडल्यात मोनालीच्या हाताला दुखापत होऊन फ्रॅक्चर झाल्या आहे. शशिकला बाईच्या कमरेला मार लागला, असे त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे. या अपघात प्रकरणी अवधूतवाडी पोलिसांनी फिर्यादीच्या तक्रारीवरून शाईन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मोटरपंपाची चोरी

बाभूळगाव : बाभूळगाव पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या गिमोना शेत शिवारामध्ये चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून लता गजानन सावसाकडे (४०) राहणार बाभूळगाव यांच्या शेतातील मोटरपंप चोरून नेला. सावसाकडे यांच्या विहिरीवर लावलेला लक्ष्मी कंपनीचा पाच एचपी मोटर पंप आणि त्या शेताच्या बाजूला असलेल्या अंबादास सूर्यवंशी जांभूळकर यांचा एक्का लँड कंपनीचा पाच एचपीचे मोटरपंप चोरून नेले. यातील संशयित आरोपी शिकारी शेख रशीद (३५), शाहरुख शब्बीर खान पठाण (३५) रा. गणोरी तालुका बाभूळगाव या दोघांना ताब्यात घेतले असून चौकशी सुरू असून त्यांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

‘एमआयडीसी’ भूखंडावर अतिक्रमण, कोट्यवधींची जीएसटी वसुलीही प्रलंबित, खासगी गुंतवणुकीचे दावे फोल

उद्योगाची वानवा; बेरोजगारीचे सावट

केशव सवळकर

यवतमाळ : राजकीय पटलावर आगामी हिवाळी अधिवेशनाची उत्सुकता ताणली गेलेली असताना जिल्ह्यातील बेरोजगारीसह औद्योगिक प्रश्नावर विधिमंडळ गाजविणार कोण, हा प्रश्न आहे. दरवर्षी हजारो टन कापूस आणि सोयाबीनचे उत्पादन देऊन राज्याच्या कृषी समृद्धीत हातभार लावणाऱ्या या जिल्ह्याची ओळख अजूनही ‘मागास आणि शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा’ अशीच राहिली आहे. त्यातच पांढऱ्या सोन्याच्या या भूमीवर बेरोजगारीचे सावट चिंताजनक पद्धतीने पसरले आहे.

दिग्गज राजकीय नेत्यांचा जिल्हा अशी यवतमाळची ख्याती. मात्र, जिल्ह्यात बेरोजगारीचा प्रश्न गंभीर आहे. १९७८ पासून यवतमाळ, पुसद, वणी, दारव्हा, दिग्रस, कळंब, घाटंजी, महागाव, मारेगाव व उमरखेड या तालुक्यात एमआयडीसी उभारून १९१६.११ एकरात १४०५ भूखंड उद्योगांसाठी आरक्षित केले. त्यातून १२६५ एकरावरील १२९२ भूखंड वाटप झाले. त्यातही प्रत्यक्षात ४३२ भूखंडांवर उद्योग सुरू असून १२३ भूखंडांवरील उद्योग बंद तर १४० रिक्त आहेत. दै. लोकसूत्रने यावर मध्यंतरी कॅगच्या ऑडिटवरून वृत्तही प्रकाशित केले. मात्र,



संग्रहित

जिल्ह्याच्या दोन कॅबिनेट मंत्र्यांसह राज्यमंत्री व आमदारांनी या वृत्ताकडे गांभिर्याने बघितले नाही. सध्या पांढरकवड्यात ८६ हेक्टर तर नेर तालुक्यातील वटफळीत १०० ते ३०० हेक्टरवरील दुसऱ्या नव्या एमआयडीसीची शासनस्तरावर हालचाल * पान ४ वर

स्थानिक पातळीवर अपुरे वेतन

आयटीआय किंवा डिप्लोमा केलेल्या तरुणांना स्थानिक स्तरावर अवघ्या पाच ते आठ हजारांच्या कंत्राटी मानधनावर काम करावे लागते. रोजगाराच्या शोधात जिल्ह्यातील हजारो सुशिक्षित तरुण पुणे, मुंबई, सुरत आणि नागपूर यासारख्या शहरांमध्ये स्थलांतरित होत आहेत.

यवतमाळातले उद्योग का बंद पडले ?

भूतकाळात ओरिएंट सिंथेटिक्स आणि हिंदुस्तान युनिलिव्हर सारखे मोठे उद्योग बंद पडले किंवा इतर राज्यात स्थलांतरित झाले.एमआयडीसी क्षेत्रात पाणी, २४ तास वीजपुरवठा, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आणि रस्त्यांसारख्या मूलभूत पायाभूत सुविधांचा अभाव असल्याने नवीन बडे उद्योग येथे येण्यास तयार नाहीत. कॅगने नोंदवल्याप्रमाणे, भूखंड ताब्यात घेऊन उद्योग न उभारणाऱ्यांकडून जमिनी परत घेण्याची प्रक्रिया अत्यंत संथ गतीने सुरू आहे. दळणवळणाचा प्रश्नही गंभीर आहे. रेल्वेमार्ग आजवर नसल्याने हे उद्योग सोयीच्या ठिकाणी हलविले गेले.

बेरोजगारीचे भयावह वास्तव

जिल्ह्यात दरवर्षी अभियांत्रिकी, पॉलिटेक्निक, आयटीआय व पदवी शिक्षण पूर्ण करून अंदाजे २० ते २५ हजार तरुण बाहेर पडतात. मात्र, स्थानिकस्तरावर औद्योगिक रोजगाराचा ड्राय झोन असल्याने या तरुणांसमोर बेरोजगारीचे गंभीर संकट आहे.

प्रक्रिया उद्योगात शून्य

जिल्ह्यात दरवर्षी पाच लाख हेक्टरहून अधिक क्षेत्रावर कापूस आणि अडीच लाख हेक्टरहून अधिक क्षेत्रावर सोयाबीनचे पीक घेतले जाते. दुर्दैवाची बाब म्हणजे ९०टक्के पेक्षा जास्त कापूस व सोयाबीन केवळ कच्चा माल म्हणून जिल्ह्याबाहेर पाठवला जातो. जिल्ह्यामध्ये ॲग्रो-प्रोसेसिंग, स्पिनिंग मिल्स, गारमेंट पार्क किंवा सोया-प्रोटीन एक्सट्रॅक्शन हब नसल्यामुळे शेतकऱ्यांना कापसाचे योग्य भाव मिळत नाही आणि तरुणांना रोजगारही मिळत नाही.

हिवाळी अधिवेशनाकडून अपेक्षा

आगामी हिवाळी अधिवेशनात लोकप्रतिनिधींनी केवळ नव्या एमआयडीसींची घोषणा न करता खालील मुद्द्यांवर ठोस उत्तर देण्याची मागणी यवतमाळकर करत आहेत. बंद पडलेल्या उद्योगांचे भूखंड तत्काळ परत घेऊन नवीन ॲग्रो-प्रोसेसिंग उद्योजकांना देण्यात यावेत. यवतमाळमध्ये टेक्स्टाईल व फूड प्रोसेसिंग झोनसाठी विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करावे. या पायाभूत प्रकल्पांना कालमर्यादेत पूर्ण करून औद्योगिक मालवाहतुकीसाठी यवतमाळला थेट जोडले जावे.

खासगी गुंतवणुकीची अवस्था काय ?

शासनासह खासगी क्षेत्रातील कंपन्यांनी जिल्ह्यासाठी काही महत्त्वाकांक्षी प्रकल्पांची घोषणा केली आहे. रिलायन्स कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्प (नेर) तालुक्यात आहे. सुमारे २०० हून अधिक लोकांना रोजगार देणारा हा हरित ऊर्जा प्रकल्प सकारात्मक पाऊल ठरत आहे. आव्हाडा ग्रुपने ११ ठिकाणी ३५ मेगावॅटचे सौर प्रकल्प उभारून मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० अंतर्गत १६७ गावांतील १४ हजार ९०० शेतकऱ्यांना फायदा देण्याचा दावा केला जात आहे. फेरो अलॉय विस्तार (२४,३००) आणि प्रस्तावित सिमेंट प्रकल्प (७ दशलक्ष टन): या प्रकल्पांची घोषणा झाली असली तरी, प्रत्यक्ष जमिनीवरील अंमलबजावणी, पर्यावरण परवानग्या आणि स्थानिकांना मिळणारा रोजगाराचा वाटा अजूनही अनिश्चिततेच्या गर्तेत आहे.

ऐनवेळेवर स्थानिक लोकप्रतिनिधीची धडपड, आत्महत्याग्रस्त कुटुंबाला पवार देणार भेट

आ. रोहित पवारांच्या दौऱ्याचा धसका !

लोकसूत्र प्रतिनिधी

फुलसावंगी : सततची नापिकी,अन् कर्जाचे ओझे या दुष्टचक्रात अडकून फुलसावंगीतील अल्पभूधारक शेतकरी जगजीवन डोंगरे यांनी २७ ऑक्टोबरला विहिरीत उडी घेऊन आपली जीवनयात्रा संपवली. त्यामुळे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आ. रोहीत पवार उद्या ६ नोव्हेंबरला डोंगरे कुटुंबाच्या सांत्वनासाठी व काळी दिवाळी उपक्रमात सहभागी होण्यासाठी फुलसावंगीत दाखल होत आहेत. मात्र, पवारांच्या या दौऱ्याची



धास्ती आता भाजपाच्या स्थानिक आमदाराने घेतल्याचेही पुढे आले आहे.

जगजीवन डोंगरे या शेतकऱ्याने कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केली. जिल्ह्यात २००१ ते २०२६ पर्यंत साडेसहा हजारांहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. टाटा ट्रस्ट, इंदिरा गांधी इन्टिट्युट, डॉ. नरेंद्र जाधव समितीसह अनेक समित्यांनी आत्महत्या रोखण्यासाठी उपाय सुचविणारे अहवाल शासनाला दिले. मात्र, आजही आत्महत्यांची धग कायम आहे. महागाव तालुक्यातील चिलगव्हाणचे * पान ४ वर

ऐनवेळेवर सहानुभूतीचा आव

विरोधी पक्ष येणार म्हणून आता सहानुभूतीचा आव आणत आहात का, असा तिखट सवाल संतप्त ग्रामस्थ आणि शेतकरी विचारत आहेत. दरम्यान, आ. रोहित पवार हे उद्या शुक्रवारी फुलसावंगी येथे भेट देऊन कै. जगजीवन डोंगरे यांच्या कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार आहेत. शासनाचे डोळे उघडण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या काळी दिवाळी निषेध आंदोलनात ते प्रत्यक्ष सहभागी होऊन महागाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या ज्वलंत व्यथांना वाचा फोडणार आहेत.

भूसंपादन विभागही एसीबीच्या रडारवर

मध्यंतरी एसीबीने पाठविलेल्या पत्राची चर्चा


रेल्वे-रस्ते प्रकल्पाच्या भूसंपादनात तडजोडी

लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांसह वर्धा-यवतमाळ-नांदेड रेल्वे प्रकल्पाच्या भूसंपादनात वाढीव मोबदल्याच्या तडजोडीचे प्रकार घडत असल्याची बाब पुढे आली आहे. मध्यंतरी भूसंपादनात अनेकांना मलिदा मिळवून देण्याचे प्रकार घडले. चिरीमिरी न देणाऱ्या भूमालकास प्रस्तावात अनेक त्रुट्या काढून जेरीस आणले जाते. दरम्यान, भूधारक महिलेने मध्यंतरी भूसंपादनमधील एकाची थेट एसीबीकडे तक्रार केली. मात्र, कारवाईऐवजी जिल्हाधिकाऱ्यांकडे पत्र पाठविण्याचा प्रकार घडल्याने सदर लाचखोर लोकसेवक अलर्ट झाल्याची माहिती आहे.

यवतमाळ जिल्ह्यात वर्धा-यवतमाळ-नांदेड या २८४ किमी लांबीच्या रेल्वेमार्गासह नागपूर-बोरी-तुळजापूर (एनएच ३६१), यवतमाळ-वणी-चंद्रपूर जोडरस्ते सोबतच काही सिंचन प्रकल्पांसाठीही भुसंपादनाची प्रक्रिया गेल्या काही वर्षांपासून राबविली जात आहे. प्रामुख्याने पूर्वी भूसंपादनासाठी १८९४ च्या कायद्यान्वये तब्बल ११३ वर्षांपर्यंत प्रक्रिया राबविली जायची. काँग्रेसच्या राजवटीत २०१३ मध्ये नवीन भूसंपादन कायदा अस्तित्वात आला. या कायद्यानुसार ग्रामीण भागातील जमिनीसाठी बाजारमूल्याच्या रेडीरेकनर दर २ पट रक्कम आणि त्यावर १०० टक्के सोलेशियम अर्थात तुसड भरपाई/सहानुभूती रक्कम दिली जाते. शहरी भागात बाजारमूल्यांच्या एकपट प्लस १०० टक्के सोलेशिअम दिले जाते. राष्ट्रीय महामार्ग कायदा १९५६(कलम ३-ए ते ३-एच) अर्थात एनएचएआय च्या रस्त्यासाठी या कायद्याखाली भूसंपादन अधिकारी नेमले जातात. महाराष्ट्र शासनाने २०१५ व त्यापुढील सुधारणा करून थेट खरेदी व वाटाघाटीचे धोरण निवडले आहे. भूसंपादन प्रक्रियेचा वेळ वाचविण्यासाठी शासन शेतकऱ्यांकडून थेट खरेदीने जमीन घेते. ज्यामध्ये सामान्य निवाड्यापेक्षा अधिक मोबदला मिळतो. एकंदरीत भूमालक अधिक मोबदला मिळावा म्हणून प्रयत्नशील * पान ४ वर

वाढीव मोबदल्यासाठी दलालांचे नेटवर्क



भूसंपादन विभागातील घडामोडींवर कटाक्ष हवा

भूसंपादनाच्या प्रक्रियेत मध्यंतरी अनेक अनागोंदी घडल्या आहेत. एसीबीपर्यंत तक्रार जात असेल तर त्यावर जिल्हाधिकाऱ्यांसह विभागीय आयुक्तांनीही लक्ष देण्याची गरज असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे सत्यता पडताळून या विभागातील तडजोड बहाद्दरांना वेळीच बाजुला करावे व भूसंपादनात वाढीव मोबदल्याच्या किंवा इतर करामती प्रक्रियेची चौकशी होण्याची गरज आहे.

शेतकऱ्यांची तक्रार ऐकली, प्रत्यक्ष मोका पाहणीला अधिकारी फिरकलेच नाहीत

कृषी विभागाच्या चौकशीवरच प्रश्नचिन्ह

राहुल वानखडे

आर्णी : कृषी विभागातील कथित भ्रष्टाचार आणि विविध अनियमिततेविरोधात शेंदूरसणी येथील शेतकऱ्यांनी अमरावतीतील कृषी सहसंचालकांकडे लेखी तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची दखल घेत सहसंचालकांनी वाशिम येथील उपविभागीय कृषी अधिकारी (एसडीएओ) संतोष वाळके यांच्याकडे चौकशीची जबाबदारी सोपविली. त्यानुसार संतोष वाळके यांनी आर्णी येथील कृषी विभागाच्या कार्यालयात शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेतले. मात्र, तक्रारीत नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी संबंधित ठिकाणी मोका पाहणी करण्यात आली नसल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून होत आहे.

केवळ कार्यालयात बसून तक्रारदारांचे म्हणणे ऐकून घेतल्याने चौकशी पूर्ण कशी होणार, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. प्रत्यक्ष * पान ४ वर

शेतकऱ्यांची मागणी काय ?

तक्रारीतील प्रत्येक मुद्द्याची सखोल चौकशी करावी. संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष मोका पाहणी करावी. कृषी विभागाच्या योजनांमधील अनियमिततेची तपासणी करावी. दोषी आढळणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी, अशा मागण्या आहेत.

कोंबड्याची चोरी

यवतमाळ : येथील वंजारी फैल परिसरातील रहिवासी असणारे गजानन कवडूजी इरपाते (६०) यांचे साकूर येथे शेत असून त्यांनी आपल्या शेतामध्ये ३० कोंबडे आणि कोंबड्या ठेवल्या होत्या त्याच गावातील शैलेश देविदास निंबाळकर आणि त्याच्या दोन सहकाऱ्यांनी या कोंबड्याची चोरी केली. एकूण चोरी गेलेल्या कोंबड्यांची किंमत १२ हजार पाचशे रुपये एवढे आहे. यवतमाळ ग्रामीण पोलिसांनी शैलेश देविदास निंबाळकर आणि त्याच्या दोन सहकार्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पुरवठा विभागाचा अव्वल कारकून एसीबीच्या जाळ्यात

लोकसूत्र प्रतिनिधी

५० हजारांची लाच घेणे भोवले, मध्यस्थीमुळे संघटनेच्या पदाधिकारीही अडकला

यवतमाळ : तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागातील अव्वल कारकुनाने रास्तभाव दुकानदाराविरुद्धच्या तक्रारीचे गांभीर्य कमी करण्यासाठी चक्क ५० हजारांची लाच मागितली. संघटनेच्या पदाधिकाऱ्याने या प्रभारी निरीक्षकाच्या सांगण्यावरून ही लाच स्विकारली. दरम्यान, सदर खासगी इसमाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहात पकडले. ही सापळा कारवाई ४ नोव्हेंबरला रात्री ८.१६ ते ९.१० वाजताच्या दरम्यान बसस्टॉप ते दत्त चौक रोडवरील श्रीकृष्ण मोबाईल शॉपीसमोर करण्यात आली.

नीलेश भास्कर कळसकर (३८) रा. आयडीबीआय बँकेजवळ, संह्याद्री अपार्टमेंट, राऊतनगर, छाया रंगारी यांच्या घरी किरायाने, मूळ पत्ता वानखडे हाऊसिंग सोसायटी, प्लॉट नं. २३-ब, सरकारी दवाखान्याजवळ, जळगाव असे लाचखोर अव्वल कारकुनाचे नाव आहे.तर चंद्रशेखर खुशालराव गायकी (६०) खासगी इसम, रा. कापरा मेथड, ता. यवतमाळ असे रक्कम स्विकारणाऱ्याचे नाव आहे. यवतमाळ तहसील कार्यालयात प्रभारी पुरवठा निरीक्षक म्हणून कळसकर कार्यरत आहेत. तर गायकी हे रास्तभाव दुकानदारांच्या संघटनेचे पदाधिकारी असल्याचे बोलेले जाते. यवतमाळ तालुक्यातील खानगावच्या ग्रामस्थांनी स्थानिक रास्तभाव दुकानातील गैरप्रकारासंदर्भात तक्रार केली होती. सदर दुकानदाराने धान्याचे वितरण केले नव्हते. दरम्यान, या प्रकरणाची चौकशी यवतमाळ पुरवठा विभागाकडून सुरू होती. यामध्ये कळसकर याने या दुकानदाराविरुद्धच्या तक्रारअर्जाची चौकशी व दुकानाच्या तपासणी अहवालातील गांभीर्य कमी करून राशन दुकानाचा परवाना कायमस्वरुपी रद्द होऊ नये, असा अहवाल पाठविण्याकरिता कळसकर याने ५० हजारांच्या लाचेची मागणी केली होती. मात्र, ही रक्कम द्यायची नसल्याने २६ ऑक्टोबरला घडलेल्या प्रकरणाची तक्रार संबंधिताने एसीबीकडे केली. त्यावरून २७ ते २९ ऑक्टोबरदरम्यान एसीबीच्या पथकाने पंचांसमक्ष पडताळणी करून कळसकर याने लाच मागितल्याचे निष्पन्न करण्याचा प्रयत्न केला. लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले नसताना ४ नोव्हेंबरला दुपारी २.३१ ते ३.५६ वाजताच्या सुमारास कळसकर याने



संग्रहित

यवतमाळ तहसील कार्यालयात संघटनेचा पदाधिकारी असलेला इसम गायकी याच्या मार्फतीने ५० हजारांची रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यामुळे एसीबीच्या अधिकाऱ्यांनी काल ४ नोव्हेंबरला रात्री ८.१६ ते ९.१० वाजतादरम्यान बसस्थानक ते दत्त चौक जाणाऱ्या रोडवरील श्रीकृष्ण मोबाईल शॉपीसमोर सापळा रचला. खासगी इसम चंद्रशेखर गायकी यांनी ५० हजारांची लाच रक्कम कळसकर यांच्या सांगण्यावरून स्वीकारली. तेवढ्यात गायकींना कळसकर यांचा कॉल आला. लाच रक्कम स्वीकारल्याची खात्री झाल्यावर बिनधास्तपणे कळसकर रचलेल्या सापळ्याच्या ठिकाणी पोहोचला. दरम्यान चंद्रशेखर गायकी याच्याकडून ५० हजारांची लाच रक्कम एमएच ४२/एस २११५ या क्रमांकाच्या इनोव्हा वाहनात ठेवण्यास सांगितले. त्यानंतर कळसकरने ही रक्कम स्वीकारली. तेवढ्यात दबा धरून असलेल्या एसीबीच्या पथकाने पंचांसमक्ष कळसकरला ताब्यात घेत त्याच्याजवळील लाचेची रक्कम हस्तगत केली. या प्रकरणी अवधूतवाडी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून कळसकर व गायकी या दोघांविरुद्ध भष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ कलम ७, ७(ए) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई एसीबीचे अमरावती विभागाचे पोलीस अधीक्षक बापू बांगर, अपर पोलीस अधीक्षक सुनील किनगे यांच्या मार्गदर्शनात व अमरावतीचे पर्यवेक्षक अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक राजेश राठोड, सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक सुजाता बन्सोड यांच्या नेतृत्वात सापळा पथकाच्या पोलीस निरीक्षक चित्रा मेसरे, हवालदार प्रमोद रायपुरे, सुधीर चर्जन, चालक पोउनि सतीश किटुकले यांनी पार पाडली.


कळसकरचा अकोल्यातही घडला होता ट्रॅप

प्रभारी पुरवठा निरीक्षक असलेल्या कळसकरच्या शासकीय सेवेतील लाचखोरीच्या खमंग चर्चा आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वर्तुळात रंगल्या होत्या. यापूर्वी त्याला अकोल्यातही एसीबीने सापळा कारवाईत पकडल्याची चर्चा होती. मध्यंतरी युद्धसंघर्षामुळे पेट्रोल, डिझेल व सिलिंडर गॅसची टंचाई निर्माण झाली होती. कारवाईची जबाबदारी डीएसओंनी दिल्याने कळसकरने या कालावधीत बरीच वरकमाई केल्याची चर्चा रंगली. दसऱ्याला घेतलेल्या ‘त्या’ दोन लाखांच्या फोनचीही खमंग चर्चा होती. मुळात कुठल्याही लोकसेवकाला ४० हजारांपेक्षा जास्त रकमेची वस्तू खरेदी करण्यापूर्वी रितसर विभागप्रमुखांची परवानगी घ्यावी लागते. मात्र, अनेक लोकसेवक अशाप्रकारची परवानगी घेत नाहीत. एकंदरीत लोकसेवकांच्या अपसंपदेचीही चौकशी अनिवार्य आहे.

बेशिस्तीला सत्ता'संग' कारणीभूत

कुर्सियों की चादर पर सियासत के दाग लग गए
कुछ लोग अपनी ही नजरों में बेदाग नहीं रहे।
झुकाते रहे जो सर हर दरबार में अपनी खातिर,
वो क्या समझेंगे कि मुल्क के हालात क्या रहे!

कधीकाळी प्रशासनात अधिकारी घटनात्मक मूल्य, कायदे अन् नियमांवर बोट ठेवून प्रशासनाचा गाडा हाकायचे.त्यांना प्रशासकीय यंत्रणा हा लोकशाहीचा कणा असतो, याची जाणीव असायची. मात्र, अलीकडे प्रशासकीय विभागाचा हा कणाच वाकला आहे. एका बाजूला टी. एन. शेषनसारखे अधिकारी सत्ताधिशांना कायदे व नियमांचा आरसा दाखवून गेले. आजही तुकाराम मुंढे यांच्यासारखे बाणेदार अधिकारी आहेत. अनेक अधिकाऱ्यांनी सत्यापेक्षा सत्तेला कधीच महत्त्व दिले नव्हते. कधी कोणाचा मुजरा केला नाही आणि कोणत्याही राजकीय विचारधारेचे मांडव ताणले नाहीत. मध्यंतरी सूरज गुरव या अधिकाऱ्याने वर्दीच्या स्वाभिमानासाठी 'गडचिरोलीला जायची तयारी आहे, पण राजकीय दबावापुढे झुकणार नाही!' असे थेट छातीठोकपणे सुनावले.परंतु, आजच्या प्रशासकीय वास्तवात हे चित्र किती टिकले आहे, हा मंथनाचा विषय आहे. सध्या अनेक जिल्ह्यांच्या प्रशासनात जे घडतंय ते चीड आणणारेच नसून तर विचार करायला लावणारे आहे. एसीबीच्या राज्यातील झालेल्या कारवायांचा आलेख जर तपासला तर लाचखोरीत महसूल आणि पोलीस प्रशासनाची विदारक अवस्था दिसून येते. आज जिल्ह्या-जिल्ह्यांत कायदा आणि सुव्यवस्था कागदावर उरली आहे. जागोजागी अवैध धंद्यांचे अड्डे फुलले आहेत, जुगार, दारू आणि वाळू तस्करांना 'खाकी'चा आणि 'महसूल'चा



वरदहस्त लाभल्याचे चित्र आहे.आधी गोरगरिबांच्या हक्काचा निधी थेट पोहोचायचा, आता प्रत्येक योजनेत थेट 'टक्केवारी' ठरलेली असते. केवळ ई-निविदा, डीबीटी हे फार्स ठरलेले आहे. अवैध धंद्यांची गाडी बिनबोभाट चालावी म्हणून पोलीस ठाण्यांपासून ते महसूलच्या टेबलपर्यंत 'हप्तेखोरी'चा अघोषित रेट कार्ड फिक्स झाला आहे.राजकारणी स्वत: तर खात आहेतच, पण त्यांची भूक भागवता-भागवता आता कधी नव्हे ती सनदी अधिकारी आणि वरिष्ठ वर्तुळही शासकीय निधीतील 'टक्के' खाऊ लागले आहेत! अपवाद केवळ मोजके अधिकारी आहेत.

आज प्रशासकीय कार्यालयांची अवस्था पाहिली, तर हसूही येते आणि रागही येतो. पूर्वी जिथे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कक्षात सामान्य माणसाच्या तक्रारीवर सुनावणी व्हायची, तिथे आज चक्क कंत्राटदार आणि नेत्यांचे चमचे पाय पसरून बसलेले दिसतात!कोणत्या रस्त्याचे काम कोणाला द्यायचे आणि कोणती फाईल कोणत्या एजंटच्या माध्यमातून पास करायची, हे आता सरकारी अधिकारी ठरवत नाहीत; तर तेथे बसलेले 'कंत्राटदार कार्यकर्ते' ठरवतात. अशा अधिकाऱ्यांसाठी दोन ओळी अगदी चपखल बसतात.

'जो झुकता है, उसे झुकाने की आदत जमाने को पड़ जाती है,
मगर उसूलों पर जीने वाले कभी झुका नहीं करते!
जिन्होंने बेच दिया जमीर कुर्सी की चाहत में,
वो साहब क्या जानें कि इमान के मायने क्या होते हैं!,

आज प्रशासनात हुजरेगिरी करणारे अधिकारी वेगाने वाढले आहेत. नेत्यांसमोर मुजरा करणे, त्यांची चरणसुख सेवा करणे आणि फाईलवर सही करताना 'वरिष्ठांचा वरचा आदेश' असा शेरा मारणे हाच त्यांचा शिरस्ता बनला आहे.

सध्या सनदी आणि उच्चपदस्थ अधिकाऱ्यांमध्येही लाचखोरी आणि भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस येणे अत्यंत लांछनास्पद आहे. ज्यांच्या हातात कोट्यवधींच्या विकासाचा निधी असतो, तेच जेव्हा वैयक्तिक स्वार्थासाठी नैतिक मूल्ये गुंडाळून ठेवतात, तेव्हा सामान्यांचा विश्वासाचा पाया हादरून जातो.पद आणि प्रतिष्ठा तात्कालिक असते, पण कर्तयातून निर्माण झालेला लोकांचा आदर हा कायमस्वरूपी असतो, हे आजचे अधिकारी विसरत चालले आहेत.जनतेच्या पैशांवर डल्ला मारून स्वत:च्या तिजोऱ्या भरणारी ही मंडळी स्वत:ला लोकसेवक म्हणवून घेण्यासही पात्र उरलेली नाहीत. प्रशासनात आज लाचार किंवा मूकदर्शक अधिकाऱ्यांची गरज नाही, तर अन्यायाविरुद्ध छाती काढून उभे राहणाऱ्या, कायद्याचे पालन करणाऱ्या धाडसी अधिकाऱ्यांची नितांत आवश्यकता आहे.

"तूफानों से जो डर जाए, वो साया नहीं होता,
हक की खातिर लड़ने वाला ही असली नायक होता है।
जमीर बेचकर जो शोहरत हासिल हो,
किस काम की ?इतिहास उसी का बनता है,
जिसका ईमान कायम रहता है!"

सूरज गुरव यांच्यासारखे अधिकारी जेव्हा छातीठोकपणे उभे राहतात, तेव्हा सर्वसामान्य जनतेच्या मनात आशेचा किरण जागा होतो. गरज आहे ती अशाच निर्भय, प्रामाणिक आणि स्वाभिमानी अधिकाऱ्यांच्या पिढीची, जी सत्तेच्या दरबारात नाही, तर संविधानाच्या आणि जनतेच्या न्यायालयात उत्तरदायी असेल!

केशव सवळकर
9623207355

शिव स्वरोदय शास्त्र: श्वास, मज्जासंस्था आणि जीवन उर्जेचे प्रगत विज्ञान

'शिव स्वरोदय शास्त्र' हा केवळ श्वासाचा अभ्यास नसून मानवी शरीर, मन आणि निसर्ग यांच्यातील उर्जेचा समतोल साधणारा एक अत्यंत प्रगत ग्रंथ आहे. भगवान शिव आणि माता पार्वती यांच्या संवादातून रचलेल्या या ग्रंथात श्वासाला मानवी जीवनाचे मूळ केंद्र मानले गेले आहे. आधुनिक न्यूरोसायन्स (Neuroscience) आणि बायोलोजीच्या (Biology) दृष्टीने या प्राचीन विज्ञानाची खोली समजून घेतल्यास आपल्याला थक्क करणाऱ्या गोष्टी समोर येतात. १. नाडी व्यवस्था आणि आधुनिक मज्जासंस्था (Nervous System) ग्रंथामध्ये शरीरात ७२,००० नाड्या असल्याचे सांगितले आहे, त्यापैकी मुख्य तीन नाड्या आपल्या श्वासाच्या प्रवाहावर नियंत्रण ठेवतात: इडा नाडी (चंद्र स्वर – डावी नाकपुडी)

: वैज्ञानिक संदर्भ: हे आपल्या शरीराच्या Parasympathetic Nervous System (PNS) शी जोडलेले आहे. कार्य: ही शीतलता, विश्रांती आणि संवर्धनाची ऊर्जा आहे. जेव्हा डाव्या नाकपुडीतून श्वास चालतो, तेव्हा शरीराचे रक्ताभिसरण मंद होते, मानसिक शांतता मिळते आणि भावनांवर नियंत्रण राहते. कला, साहित्य, चिंतन किंवा शांतपणे विचार करण्याची कामे या काळात उत्तम होतात. पिंगला नाडी (सूर्य स्वर - उजवी नाकपुडी): वैज्ञानिक संदर्भ: हे आपल्या शरीराच्या Sympathetic Nervous System (SNS) शी जोडलेले आहे. कार्य: ही उष्णता, पराक्रम आणि शारीरिक हालचालींची ऊर्जा आहे. उजव्या नाकपुडीचा श्वास शरीराला सक्रिय बनवतो, पचनक्रिया तीव्र करतो आणि स्नायूंमध्ये रक्तप्रवाह वाढवतो. शारीरिक श्रम, खेळ, गणितीय किंवा आक्रमक निर्णय घेण्याचे कार्य या काळात प्रभावी ठरतात. सुषुम्ना नाडी (मध्य स्वर - दोन्ही नाकपुड्या समान): वैज्ञानिक संदर्भ: हे Central Nervous System (CNS) आणि मेंदूच्या दोन्ही गोलार्धांचा (Left & Right Hemispheres) समतोल दर्शवते. कार्य: जेव्हा दोन्ही नाकपुड्यांमधून श्वास सारखा वाहतो, तेव्हा ऊर्जा संतुलित होऊन मन अंतर्मुख होते. हा काळ भौतिक जगातील कामांसाठी नव्हे, तर अध्यात्म, उच्च ध्यान आणि आत्मचिंतनासाठी सर्वोत्तम मानला जातो.



२. नासिका चक्र (Nasal Cycle) आणि शरीराचे जैविक घड्याळ आधुनिक वैद्यकशास्त्रात याला 'Ultra-rhythmic cycle' किंवा 'Nasal cycle' म्हणतात. आपल्या शरीरात एक नाकपुडी काही वेळ मुख्य असते (dominant असते) आणि दुसरी विश्रांतीवर असते. शारीरिक संतुलन: जर हा चक्र बिघडला, तर सर्दी, सायनस, पचनाचे विकार किंवा मानसिक अस्वस्थता वाढू शकते. आरोग्याची गुरुकिल्ली: शिव स्वरोदय शास्त्रानुसार, आजार येण्यापूर्वी शरीरात कोणता स्वर चुकीच्या वेळी चालला आहे, यावरून रोगाचे निदान करता येते. उदाहरणार्थ, नेहमी सूर्य स्वर (उजवी नाकपुडी) जास्त काळ चालल्यास शरीरात उष्णता वाढून उच्च रक्तदाब (High BP) किंवा अस्वस्थता वाढू शकते. ३. दैनंदिन जीवनात स्वरांचा व्यावहारिक आणि वैज्ञानिक वापर भगवान शिवांनी याशास्त्रात काही अचूक नियम सांगितले आहेत, जे आधुनिक जीवनशैलीत तणावमुक्त राहण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकतात:

प्रवासाची किंवा महत्त्वाच्या कामाची सुरुवात: घरातून बाहेर पडताना किंवा एखादे शुभ आणि कठीण काम सुरू करताना कोणता स्वर चालू आहे हे पाहण्याची परंपरा आपल्या संस्कृतीत आहे. जर उजवीकडे जायचे असेल आणि त्या वेळी योग्य स्वर चालू असेल, तर यश मिळण्याची शक्यता वाढते, कारण तो मेंदूच्या सक्रिय स्थितीशी जोडलेला असतो. झोपण्याची दिशा आणि स्वर: झोपताना उजव्या कुशीवर झोपल्यास डावी नाकपुडी (चंद्र स्वर) चालू होते, ज्यामुळे शरीर शांत होऊन गाढ आणि शांत झोप लागते. क्रोध आणि मानसिक ताणावर मात: जेव्हा खूप राग किंवा मानसिक तणाव येतो, तेव्हा शरीरात पिंगला नाडी अतिसक्रिय झालेली असते. अशा वेळी शांतपणे डाव्या नाकपुडीने श्वास घेतल्यास (उजवी नाकपुडी बोटाने बंद करून) काही मिनिटांतच मन शांत होते आणि कोर्टिसोल (ताण निर्माण करणारे संप्रेरक) कमी होण्यास मदत होते. ४. स्वरोदय आणि निसर्गाचा संबंध (Panchamahabhutas) शिव स्वरोदय शास्त्राचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे पंचमहाभूते (पृथ्वी, जल, अग्नी, वायू, आकाश) यांचा श्वासाशी असणारा संबंध. श्वास बाहेर सोडताना किंवा नाकपुडीच्या उष्णतेवरून कोणता घटक (Element) सध्या शरीरात प्रभावी आहे हे ओळखता येते: अग्नी तत्व सक्रिय असताना घेतलेले निर्णय जलद होतात. जल किंवा पृथ्वी तत्व सक्रिय असताना घेतलेले निर्णय दीर्घकाळ टिकणारे आणि स्थिरता देणारे असतात.

निष्कर्ष शिव स्वरोदय शास्त्र हे केवळ धार्मिक किंवा कर्मकांडीय पुस्तक नसून ते मानवी बायो-इलेक्ट्रिक ऊर्जा (Bio-energy) नियंत्रित करण्याचे परिपूर्ण विज्ञान आहे. आजचे आधुनिक विज्ञान ज्याला 'माइंडफुलनेस' किंवा 'नर्व्हस सिस्टम रेग्युलेशन' म्हणते, त्याचे मूळ आपल्या प्राचीन ग्रंथांमध्ये हजारो वर्षांपूर्वी अतिशय सोप्या पद्धतीने मांडले गेले आहे. श्वासाची ही लय ओळखणे म्हणजेच आपल्या जीवनाची सुकाणू स्वत:च्या हातात घेणे होय. आपल्या दैनंदिन जीवनशैलीत किंवा कामाच्या ताणाचे व्यवस्थापन करताना या स्वरांच्या प्रयोगाबद्दल अधिक सखोल जाणून घ्यायला आवडेल का?

केशव सवळकर
9623207355

ठाकूरजीबद्दल शास्त्रींचा आगाऊपणा...

'आमचे'आणि 'तुमचे'ठाकूरजी!

भारतीय संस्कृतीत आणि ईश्वराच्या अवतारांमध्ये पूर्ण अवतार भगवान श्रीकृष्णाचे स्थान उच्च कोटीच्या श्रद्धा आणि आग्रहाचे आहे. ओशो रजनीश यांनी तर म्हटले आहे की, भगवान श्रीकृष्णासारखा पूर्ण होतात न भूतो न भविष्यती आहे. कृष्ण मोरपंख लावू शकतो सुवर्णालंकार परिधान करू शकतो पायात पायल घालून नृत्य करू शकतो बासुरी वाजवू शकतो आणि युद्ध भूमीवर गीतेचा संदेशही देऊ शकतो आपल्या शिष्याच्या रथाचे सारत्यही करू शकतो, असा अद्भुत अवतार होणे नाही. हिंदू संस्कृतीत कृष्णावतार सर्वत्र व्यापक आहे. मात्र याच भगवान श्रीकृष्णांबद्दल स्वत:ला धर्माचे ठेकेदार म्हणून म्हणवणारे बागेश्वर धामचे प्रमुख पुजारी धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी २८-२९ ऑक्टोबर रोजी मध्यप्रदेशातील शिवपुरी जिल्ह्यातील करैरा येथे आयोजित श्रीराम कथेदरम्यान केलेल्या वक्तव्याने कृष्ण भक्तांमध्ये आणि एकूणच हिंदू समाजात कमालीचा असंतोष निर्माण केला केला. कथेदरम्यान प्रभू राम आणि कृष्ण यांची तुलना करताना ते म्हणाले, "तुमच्या ठाकूरजींचा कोणताही फोटो बघा. उभे राहतानाही ते तीन ठिकाणी वाकडे असतात. ते पाय दुमडून बसतात, कधीकधी कंबर हलवतात आणि वाकड्या मानेने बासरी वाजवतात. आमचे ठाकूरजी अगदी सरळ उभे राहतात. आमचे नाव सरळ आहे, आमचे ठाकूरजी सरळ चालतात आणि आमचे ठाकूरजी सरळ दिसतात. तुमचे ठाकूरजींचे नाव वाकडे आहे, पण ते वाकडे चालतात आणि वाकडे दिसतात." दुसऱ्या एका व्हिडिओमध्ये त्यांनी हेच विधान अशाप्रकारे केले, "आमचे राम सरळ आहेत, तुमचे कृष्ण वाकडे आहेत. तुमच्या ठाकूरजींची कवटी वाकडी आहे, नाव वाकडे आहे आणि ते वाकडे चालतात व उभे राहतात."

'आमचे'आणि 'तुमचे'ठाकूरजी! असा राम आणि कृष्ण यांच्यात भेद करून कृष्णाबद्दल जी भावना व्यक्त केली हे विधान केले त्याचा प्रतिवाद मात्र हिंदू मी केला नाही, धीरेंद्र शास्त्री यांच्यावर केली नाही आणि त्यांना जाबही विचारला नाही, उलट मौन बाळगणे पसंत केले . धीरेंद्र शास्त्री यांनी 'आमचे ठाकुर जी व तुमचे ठाकूरजी ' असे म्हणून प्रभू राम आणि कृष्ण यांच्यात भेद केल्याचा आणि कृष्णाच्या त्रिभंगी मुद्रेची खिल्ली उडवल्याचा आरोप , मथुरा-वृंदावनचे संत, यादव समाज आणि विरोधी पक्षांच्या नेत्यांनी करीत धीरेल शास्त्रीचा निषेध नोंदवला. अखिलेश यादव म्हणाले की, यामुळे यदुवंशी आणि रघुवंशींच्या भावना दुखावल्या आहेत आणि त्यांना ब्रज किंवा अवधमध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

शास्त्रींवर कठोर टीका व्हायला लागली तेव्हा, धीरेंद्र शास्त्री यांनी स्पष्ट केले की, हा 'भावनेच्या भरात ते बोलून गेलो. माझे दिल्लीचे पत्रकार मित्र अजित दिवेदी यांनी लिहिले आहे की, धीरेंद्र शास्त्री यांनी भगवान कृष्णाबद्दल केलेले विधान उत्स्फूर्त किंवा भावनेच्या भरात केलेले नव्हते. ती एक विचारपूर्वक केलेली टिप्पणी होती, जिला मोठे राजकीय महत्त्व आणि एक गहन सांस्कृतिक उद्देश होता. हे समजून घेण्यासाठी दोन गोष्टी विचारात घेणे आवश्यक आहे. पहिली गोष्ट म्हणजे, भारतीय जनता पक्षाने धीरेंद्र शास्त्री यांच्या विधानावर पूर्णपणे मौन बाळगले. भाजपच्या तथाकथित सनातनी नेत्यांपैकी कोणीही प्रतिसाद दिला नाही. धार्मिक ग्रंथांचे अभ्यासक सुधांशू त्रिवेदी यांच्यापासून ते प्रत्येक विषयावर नेहमीच विधाने करणाऱ्या गिरिराज सिंह यांच्यापर्यंत, सर्वजण गप्प राहिले. भाजपच्या छोट्या प्रवक्त्यांनी विधाने केली, पण त्यांचे लक्ष्य धीरेंद्र शास्त्री नसून अखिलेश यादव आणि तेजस्वी यादव होते. भाजपचे मौन आणि अखिलेश यादव, तेजस्वी यादव व पप्पू यादव यांनी धीरेंद्र शास्त्री यांच्या विरोधात घेतलेली स्पष्ट भूमिका, यामागे त्यांचा राजकीय हेतू असल्याचे सूचित करते. दुसरे म्हणजे, धीरेंद्र शास्त्री यांचे विधान त्यांच्या अलीकडील विधानांच्या संदर्भात पाहिले पाहिजे. काही दिवसांपूर्वी ते पश्चिम बंगालमध्ये गेले होते आणि त्यांनी लोकांना दुर्गापूजेदरम्यान मांस न खाण्याचे आवाहन केले होते. जेव्हा हा वाद निर्माण झाला, तेव्हा राज्यातील भाजप नेते मंदिरात बसून मांस खाल्ले आणि त्याचा व्हिडिओ पोस्ट केला. तरीही, काही राज्य नेत्यांनी धीरेंद्र शास्त्री यांच्यावर टीका केली, परंतु राष्ट्रीय नेते गप्प राहिले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, हिंदूंच्या हिताचे रक्षण करणाऱ्या संघटनांनीही त्यांच्या विधानांना मौन संमती दिली. याचे कारण म्हणजे, हे विधान राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भाजपच्या 'प्रोजेक्ट हिंदुत्व' या तत्त्वज्ञानाशी सुसंगत होते. तरीही, धीरेंद्र शास्त्री यांचे भगवान कृष्णाबद्दलचे विधान, प्रथमदर्शनी, निव्वळ राजकीय असल्याचे दिसते. उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, त्यावर आलेली प्रतिक्रिया अपेक्षेप्रमाणेच आहे. निवेदन प्रसिद्ध होताच, अखिलेश यादव, तेजस्वी यादव आणि पप्पू यादव यांच्यासारखे नेते धीरेंद्र शास्त्रींच्या विरोधात उभे राहिले. त्यांनी सनातन धर्म आणि हिंदुत्वाचा मुद्दा उपस्थित केला, पण लोकांच्या लक्षात आले की, यदू कुळात जन्मलेल्या आणि भगवान विष्णूचा आठवा अवतार असलेल्या भगवान कृष्णाचा झालेला अपमान यादव नेत्यांना संतप्त करणारा होता आणि त्यांनी आंदोलन केले. हिंदुत्वाच्या व्यापक छत्रातून यादवांना वगळण्याची ही एक रणनीती असू शकते. यामुळे भाजपला गैर-यादव मागासलेल्या वर्गांना आणि इतर हिंदूंना एकत्र करण्याच्या प्रयत्नांमध्ये मदत होईल. किमान वरवर पाहता, हाच उद्देश असल्याचे दिसते. म्हणूनच भाजपचे अनेक ज्येष्ठ नेते गप्प राहिले. प्रश्न असा निर्माण होतो की, बांके बिहारी मंदिर आणि मथुरेतील शाही ईदगाहवरील वाद हा श्रद्धेपेक्षा जातीय तणाव निर्माण करणे आणि राजकीय फायदा मिळवणे याबद्दल अधिक आहे का? तसे नसेल, तर भगवान कृष्णाच्या अपमानाचा निषेध म्हणून संपूर्ण भाजपने धीरेंद्र शास्त्रींच्या विरोधात उभे राहायला हवे होते. हिंदू धर्मग्रंथांमध्ये स्तुती आणि निंदेचे पुरावे आहेत, हा एक निरर्थक युक्तिवाद आहे. भाजप समर्थक विविध धर्मग्रंथांचा हवाला देऊन असा युक्तिवाद करत आहेत की, भूतकाळात देवतांची निंदा किंवा त्यांच्याविरुद्ध तक्रारी करणे सामान्य होते आणि प्रत्येक निंदेला द्वेषपूर्ण मानले जाऊ शकत नाही. हाच युक्तिवाद वापरून, उजव्या विचारसरणीच्या गटातील सदस्य धीरेंद्र शास्त्री यांचा बचाव करत आहेत. तथापि, धीरेंद्र शास्त्री ज्या पद्धतीने 'आमचे' आणि 'तुमचे' ठाकूरजी म्हणाले, त्यांचे चेहऱ्यावरील भाव आणि देहबोली कोणत्याही प्रकारे प्रशंसनीय नव्हती. ते निव्वळ चिडवण्यासाठी किंवा अपमान करण्यासाठी बोलत होते. त्यांच्या चेहऱ्यावर भक्तीचा अभाव होता, तसेच त्यांनी भक्ताचा दृढनिश्चयही दाखवला नाही. रामचरितमानस चे रचनाकार रामभक्त तुसीदासांचे एक वचन खूप प्रसिद्ध आहे:

'का बरनौं छवि आपकी भले बने हो नाथ, तुलसी मस्तक तब नवै जब धनुष बाण हो हाथ'।

इसके पीछे की कहानी यह है कि तुलसीदास ने वृंदावन के मंदिर में भगवान श्रीकृष्ण की मूर्ति के सामने सिर नहीं झुकाया था क्योंकि वे भगवान राम को अपना आराध्य मानते थे। तब उन्होंने यह दोहा कहा और भगवान विष्णु ने उन्हें धनुष, बाण के साथ यानी श्रीराम के रूप में दर्शन दिए। इस दोहे में भगवान श्रीकृष्ण की निंदा नहीं की गई है या उनका मजाक नहीं उड़ाया गया, बल्कि उनके मोहक रूप को अद्भुत बताया गया है। इसके उलट धीरेंद्र शास्त्री कृष्ण के रूप और गुण दोनों की आलोचना कर रहे थे। वे श्रीकृष्ण को रूप में 'टेड़ा' बता रहे थे और बांसुरी बजाने के लिए कह रहे थे कि 'यह तो खेल है'। यामागील कथा अशी आहे की, तुलसीदासांनी वृंदावनच्या मंदिरात भगवान कृष्णाच्या मूर्तीसमोर नतमस्तक होण्यास नकार दिला, कारण ते भगवान रामांना आपला आदर्श मानत होते. मग त्यांनी हा दोहा म्हटला आणि भगवान विष्णू धनुष्यबाण घेऊन श्रीरामाच्या रूपात त्यांच्यासमोर प्रकट झाले. हा दोहा भगवान कृष्णाचा निषेध करत नाही किंवा त्यांची थट्टा करत नाही, उलट त्यांच्या मनमोहक रूपाचे अद्भुत असे वर्णन करतो. याउलट, धीरेंद्र शास्त्री कृष्णाच्या रूपावर आणि गुणांवर टीका करत होते. त्यांनी कृष्णाच्या रूपाचे वर्णन 'वाकडे' असे केले आणि बासरी वाजवण्यास सांगितल्यावर ते म्हणाले, "हा तर फक्त एक खेळ आहे."

खरं तर, हिंदू समाजात भगवान विष्णूच्या विविध अवतारांवरील श्रद्धेबद्दल नेहमीच एक सूक्ष्म विभाजन रेषा राहिली आहे. पण कोणत्याही धार्मिक नेत्याने ती रेषा इतक्या उघडपणे ओलांडण्याचा प्रयत्न केला नव्हता. लोकसंख्येचा एक मोठा वर्ग केवळ भगवान रामांशी स्वत:ला जोडतो कारण त्यांचा जन्म क्षत्रिय कुटुंबात झाला होता, तर दुसरीकडे त्यांच्या मनात भगवान विष्णूचा सहावा अवतार असलेल्या परशुरामाबद्दल द्वेष आहे. परंतु जे स्वत:ला परशुरामाचे वंशज मानतात, त्यांनी हजारो वर्षांपासून हिंदू मानसिकतेत रघुवंश आणि यदुवंश या दोघांच्याही अवतारांना स्थापित केले आहे. हे लक्षात घेणेही महत्त्वाचे आहे की, हजारो वर्षांपासून हिंदू धर्मातील विविध श्रद्धा आणि परंपरा एकरूप झाल्या आहेत. शैव आणि वैष्णव, वैष्णव आणि शाक्त यांच्यातील वाद आणि वैष्णव पंथांमधील लढाया मोठ्या कष्टाने सोडवण्यात आल्या आहेत. अशा परिस्थितीत, धीरेंद्र शास्त्री यांचे विधान, किंवा पश्चिम बंगालमध्ये केलेले विधान, हे शतकांपूर्वी बंद झालेले प्रकरण पुन्हा उघडण्याचा आणि विभाजनाची रेषा अधिक रुंद करण्याचा प्रयत्न असल्याचे दिसते. हा हिंदू समाजाला एकाच रंगात रंगवण्याचा प्रयत्न आहे, ज्यामुळे अंतिमत: हिंदू धर्म कमकुवत होईल. हेही लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की, हिंदू धर्माची ताकद त्याच्या विविधतेत आणि लवचिकतेत आहे. बहुदेववादाची संकल्पना आणि सर्व देवतांबद्दल समान आदर हे त्याच्या अस्तित्वाचे अविभाज्य भाग आहेत. याला आव्हान देणे किंवा ही व्यवस्था जबरदस्तीने बदलण्याचा प्रयत्न करणे हे अंतिमत: हानिकारक ठरेल. किमान, जे स्वत:ला पीठाधीश्वर म्हणतात, त्यांनी अशी विधाने करणे टाळावे. ही बाबही चिंताजनक आहे की, आतापर्यंत हिंदू आणि इतर धर्मांमध्ये भेद करण्यासाठी 'आम्ही' आणि 'ते' या शब्दप्रयोगांचा वापर केला जात होता. आता, खुद्द हिंदू धर्मातच 'आमचे' आणि 'तुमचे' ठाकूरजी अशी विभागणीची रेषा ओढली जात आहे. जर हे आता थांबवले नाही, तर भविष्यात यामुळे होणाऱ्या नुकसानीची कल्पना करणेही भयावह आहे.

न. मा. जोशी
८८०५९४८९५१



टिप : या लेखांमध्ये प्रकाशित होणारी मते लेखकांची आहे. त्याच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

थोडक्यात

तीन बालकांना मिळाले हक्काचे कुटुंब



यवतमाळ : महिला व बाल विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या दत्तक विधान नियमावली २०२२ अंतर्गत जिल्ह्यात प्रथमच तीन दत्तक विधान आदेश यशस्वीरीत्या पारित करण्यात आले आहे. या प्रक्रियेमुळे तीन बालकांना प्रेम, माया, सुरक्षितता आणि हक्काचे कुटुंब मिळाले असून, दत्तक पालकांचे अनेक वर्षांपासूनचे पालकत्वाचे स्वप्न साकार झाले आहे. दत्तक विधान ही केवळ कायदेशीर प्रक्रिया नसून, बालकांना प्रेमळ कुटुंब, सुरक्षित वातावरण आणि उज्ज्वल भविष्य देणारी संवेदनशील सामाजिक प्रक्रिया आहे. जिल्ह्यातील या तीनही दत्तक प्रकरणांमध्ये बालकांच्या सर्वोत्तम हिताला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले. त्यासाठी आवश्यक कायदेशीर तरतुदींची पूर्तता, कागदपत्रांची पडताळणी तसेच विविध स्तरांवरील प्रक्रिया पूर्ण करून संपूर्ण दत्तक विधान प्रक्रिया पारदर्शक व नियमानुसार पार पाडण्यात आली. जिल्हाधिकारी विकास मीना यांनी संबंधित दत्तक विधान आदेश पारित करून या संवेदनशील प्रक्रियेला अंतिम मान्यता दिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील बाल न्याय यंत्रणा आणि जिल्हा बाल संरक्षण कक्षाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. बालकांच्या सर्वोत्तम हिताला प्राधान्य जिल्ह्यात तीन दत्तक आदेश पारित झाल्यामुळे जिल्ह्यात दत्तक विधान प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्याच्या प्रशासनाच्या प्रयत्नांना बळ मिळाले आहे. बालकांच्या हक्कांचे संरक्षण, त्यांच्या सर्वोत्तम हिताची जपणूक आणि त्यांना सुरक्षित कौटुंबिक वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा बाल संरक्षण कक्षाच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. अधिकृत दत्तक प्रक्रियेचा अवलंब करण्याचे आवाहन. पात्र व इच्छुक दाम्पत्यांनी बालक दत्तक घेताना कोणत्याही अनधिकृत व्यक्ती किंवा मध्यस्थाचा अवलंब न करता केवळ अधिकृत व कायदेशीर दत्तक प्रक्रियेचाच अवलंब करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केले आहे. दत्तक विधानाद्वारे मुल मिळाल्याने पालकांवर मोठी जबाबदारी आली आहे. सध्याचा काळ आव्हानात्मक असून, बालकाचा योग्य सांभाळ, संगोपन आणि शिक्षण याकडे विशेष लक्ष देऊन त्याचे उज्ज्वल भविष्य घडवावे. कायदेशीर पालकत्व स्वीकारल्यानंतरही दोन्ही कुटुंबांनी बालकांचे संगोपन करावे आणि समाजासमोर एक चांगले उदाहरण निर्माण करावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी यांनी केले. यावेळी जिल्हाधिकारी यांनी दत्तक पालक आणि त्यांच्या कुटुंबीयांना बालकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. अधिक माहितीसाठी जिल्हा बाल संरक्षण कक्ष, दुसरा मजला, प्रशासकीय इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे संपर्क साधावा, असे आवाहन महिला व बाल विकास विभागामार्फत करण्यात आले.

कृषी विज्ञान केंद्रात पीएम किसान योजनेच्या २४ व्या हप्त्याचे थेट प्रक्षेपण



यवतमाळ : येथील कृषी विज्ञान केंद्र येथे ३० ऑक्टोबर रोजी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या २४ व्या हप्त्याच्या वितरण कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण शेतकऱ्यांना दाखविण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झालेल्या या कार्यक्रमांतर्गत देशातील ९.३४ कोटी शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये एकूण १८ हजार ६८० कोटी रुपयांची रक्कम थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) पद्धतीने जमा करण्यात आली. यावेळी पंतप्रधानांनी विविध विकास योजनांसह १२ फलोत्पादन समूहांचा शुभारंभ केला तसेच शेतकऱ्यांना संबोधित केले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने कृषी विज्ञान केंद्र, यवतमाळ येथे आयोजित कार्यक्रमाला जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे, कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. दीपक कच्छवे यांच्यासह केंद्रातील शास्त्रज्ञ व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांची माहिती देऊन शेतकऱ्यांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. तर कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. दीपक कच्छवे यांनी दुष्काळी परिस्थितीत कमी पाण्यात घेता येणारी पिके, उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर, ठिबक व तुषार सिंचन तसेच पाणी बचतीच्या विविध उपाययोजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. याप्रसंगी विदर्भ जलसंवर्धन प्रकल्पाच्या प्रकल्प समन्वयक शिवानी शेंडे, कृषी विभागाचे कृषी अधिकारी प्रदीप वाहाने, कर्मचारी सिंधू नेहारे, कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. नरेंद्रकुमार देशमुख, मयूर ढोले, सहाय्यक प्राध्यापक स्नेहलता भागवत, राहुल चव्हाण, डॉ. प्रमोद मगर, डॉ. रुपेश झाडोदे यांच्यासह इतर कर्मचारी उपस्थित होते. खेत बचाओ' अभियानांतर्गत मार्गदर्शन*र्यक्रमा दरम्यान 'खेत बचाओ' अभियानांतर्गत रासायनिक खतांचा अतिवापर टाळून जमिनीचे आरोग्य जपणे, ठिबक व तुषार सिंचनाद्वारे पाण्याची बचत करणे, जनावरांसाठी चारा व्यवस्थापन, महिलांचे आरोग्य जपणे तसेच पिकांचे अवशेष न जाळता त्यापासून कंपोस्ट खत तयार करणे याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या तांत्रिक सत्रात रब्बी हंगामाच्या पार्श्वभूमीवर डॉ. आर. एस. जडोदे यांनी रब्बी पिकांचे सुधारित उत्पादन तंत्रज्ञान, योग्य पीक व्यवस्थापन आणि उत्पादनवाढीसाठी आवश्यक उपाययोजनांची माहिती दिली. तसेच डॉ. पी. एन. मगर यांनी खरीप व रब्बी हंगामातील पिकांवरील कीड नियंत्रणासाठी एकात्मिक कीड व्यवस्थापनाच्या विविध पद्धतींबाबत मार्गदर्शन केले. या कार्यक्रमामुळे शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांची माहिती मिळण्यासोबतच बदलत्या हवामान परिस्थितीत पाणी व्यवस्थापन, सुधारित पीक उत्पादन तंत्रज्ञान, जमिनीचे आरोग्य संवर्धन आणि एकात्मिक कीड नियंत्रण याविषयी उपयुक्त माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मयूर ढोले यांनी केले, तर आभार प्रदर्शन कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ राहुल चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कृषी विज्ञान केंद्र, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय, यवतमाळ तसेच विदर्भ जलसंवर्धन प्रकल्प, केळापूर डब्ल्यूओटीआर येथील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज ऑनलाइन भरण्याचे आवाहन

लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : ओबीसी, ईबीसी आणि डीएनटी विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या पीएम यशस्वी पूर्व-मॅट्रिक व मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये काही योजनांचे अर्ज केवळ नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर (एनएसपी) स्वीकारण्यात येणार आहेत. तर उर्वरित योजनांचे अर्ज पूर्वीप्रमाणे महाडीबीटी पोर्टलवर भरता येणार आहेत. त्यानुसार इयत्ता ९ वी व १० वीच्या ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न २.५० लाख रुपयांपेक्षा कमी आहे, अशा मुला-मुलींनी शिष्यवृत्तीसाठी राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलवर अर्ज करावेत. पालकांचे वार्षिक उत्पन्न २.५० लाख रुपयांपेक्षा जास्त असलेल्या इयत्ता ९ वी व १० वीच्या मुलींचे अर्ज तसेच इयत्ता ५ वी व ८ वीच्या मुलींचे शिष्यवृत्ती अर्ज पूर्वीप्रमाणे सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेंतर्गत महाडीबीटी पोर्टलवर भरावेत. पीएम यशस्वी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेंतर्गत इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्ग आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठीच्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेणाऱ्या इतर मागासवर्गीय मुलींसाठीची मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, अशा चार योजनांचे नवीन अर्ज केवळ नॅशनल स्कॉलरशिप पोर्टल (एनएसपी) वरच भरावेत. या योजनांसाठी नवीन अर्ज करण्याची सुविधा महाडीबीटी पोर्टलवर उपलब्ध राहणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी याची गांभीर्याने नोंद घ्यावी.दरम्यान, राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती व्हीजेएनटी व एसबीसी प्रवर्गातील इयत्ता ११ वी व १२ वीचे विद्यार्थी, व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिकणारे तसेच व्यावसायिक महाविद्यालयांशी संलग्न वसतिगृहात राहणाऱ्या व्हीजेएनटी व एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी निर्वाह भत्ता, इमाव, विमाप्र व विजाभज प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना, इमाव विमाप्र आणि विजाभज प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना या योजनांचे अर्ज पूर्वीप्रमाणे महाडीबीटी पोर्टलवर भरावेत. तसेच शासकीय किंवा खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) प्रवेश घेणाऱ्या ओबीसी, व्हीजेएनटी व एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण शुल्क परतफेड योजनेचे अर्जही महाडीबीटी पोर्टलवरच भरावेत. संबंधित विद्यार्थ्यांनी आपल्या प्रवर्गानुसार व योजनेच्या निकषांनुसार योग्य पोर्टलवर ऑनलाइन अर्ज भरून शिष्यवृत्ती योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे साहाय्यक संचालक दीपक मान्टे यांनी केले आहे.

कापसाचे गठ्ठे व साहित्याची चोरी



लोकसूत्र प्रतिनिधी

वर्णी: फिर्यादीच्या शेतातून तारेचे कंपाऊंडचे तार तोडून अज्ञात चोराने कापसाचे गेठ्ठ, जुनी वापरती झटका मशिन व पाण्याची कॅन असा एकूण १४ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. ही घटना २२ ऑक्टोबरला सकाळी ८ वाजता मेघदूत कॉलनी येथे मागच्या बाजूला शेतशिवारात घडली. दिनकर साधू ठावरी (६०) रा. रेल्वे क्रासिंगजवळ चिखलगाव वणी असे फिर्यादीचे नाव आहे. याप्रकरणी वणी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हे दाखल केले आहे.

नवीन विद्यार्थ्यांच्या ऑफलाइन प्रवेश प्रक्रियेस १३ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पं.दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेअंतर्गत व्यावसायिक व अव्यावसायिक नवीन विद्यार्थ्यांच्या ऑफलाइन प्रवेश प्रक्रियेला ३० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. या योजनांचा लाभ घेण्यासाठी नियमित विद्यार्थ्यांना ऑफलाइन पद्धतीने प्रवेश घेण्याकरिता १३ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित प्रवर्गातील जास्तीत जास्त पात्र विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे साहाय्यक संचालक दीपक मान्टे यांनी केले आहे.

गावस्तरावर कृषी अवजारे बँक स्थापनेसाठी ६० टक्के अनुदान मिळणार

लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प पोकरा टप्पा २.० अंतर्गत गावस्तरावरील कृषी अवजारे बँक या घटकासाठी पात्र गटांकडून अर्ज मागविण्यात आले आहे. या योजनेतून पात्र बचत गटांना कृषी अवजारे बँक स्थापन करण्यासाठी प्रकल्प किमतीच्या ६० टक्के अनुदान तत्वावर लाभ मिळणार आहे. कृषी विभागामार्फत अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली असून इच्छुक पात्र गटांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रकल्पाचे नोडल अधिकारी नितीन घाडगे यांनी केले आहे. या योजनेसाठी गावातील महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) व महिला आर्थिक विकास महामंडळ (मावि‌म) पुरस्कृत महिला बचत गट, महिला ग्रामसंघ तसेच आत्मा पुरस्कृत महिला शेतकरी बचत गट पात्र राहणार असून अर्ज करू शकणार आहेत. मात्र, अर्ज करण्यासाठी संबंधित बचत गटाला दोन आर्थिक वर्षे पूर्ण झालेली असणे आवश्यक आहे. प्रकल्प किमतीच्या ६० टक्के अनुदान गावस्तरावर कृषी अवजारे बँक उभारण्यासाठी प्रकल्पाच्या एकूण किमतीच्या ६० टक्के अनुदान मिळणार आहे. एका गावातून एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास एफपीओ-डीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाइन लॉटरी पद्धतीने निवड प्रक्रिया राबविण्यात येईल. यामध्ये एका गावातून एका गटाची निवड करण्यात येणार आहे. अवजारांची निवड या प्रकल्पांतर्गत गावामध्ये हवामान अनुकूल शेती तंत्रज्ञानाचा अवलंब वाढविण्यासाठी यंत्रसामग्री समाविष्ट करणे अपेक्षित आहे. त्यानुसार कृषी अवजारे बँकेमध्ये रुंद वरंबे (बेड) तयार करण्यासाठी किमान एक ते कमाल पाच बेडमेकर तसेच किमान ५ ते कमाल २५ बियाणे टोकण यंत्रे हे अवजार असणे बंधनकारक आहे. या घटकासाठी अर्ज करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. इच्छुक पात्र गटांनी अर्ज प्रक्रिया, पात्रता निकष व आवश्यक कागदपत्रांची माहिती जाणून घेण्यासाठी कृषी विभागाच्या अधिकृत पोर्टलला भेट द्यावी. अर्जासाठी लिंक देण्यात आली असून https://dbt-ndksp.mahapocra.gov.in/IndividualFarmer/Login पोर्टलवर अर्ज करणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील पात्र महिला बचत गटांनी या संधीचा लाभ घेऊन गावस्तरावर कृषी यांत्रिकीकरणाला चालना द्यावी, असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासन
कार्यालय, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पांढरकवडा जि. यवतमाळ
E-mail - pandharkawda.cc@mahapwd.gov.in / Web Site - www.mahapwd.gov.in
निविदा सूचना क्रमांक ०८/२०२६-२७

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पांढरकवडा (दूरध्वनी / फॅक्स क्रमांक ०७२३५-२२७४३१) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा मागवित आहे. निविदाविषयक तपशील www.mahapwd.gov.in या पोर्टलवर पाहावयास मिळेल व पेमेंट गेटवे द्वारे निविदा शुल्क भरून निविदा विकत घ्यावी. सदर भरून पाठविलेल्या निविदा वरील वेबसाईटवर नमूद केलेल्या दिनांकापर्यंत १५.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास नमूद दिनांकास १६.०० वाजता किंवा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पांढरकवडा हे कक्षातील त्या दिनांकास व वेळेस मोहोरबंद निविदा कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, पांढरकवडा यांचे कार्यालयात उघडण्यात येतील. निविदा विक्रीचा कालावधी व निविदा स्विकृतीचा दिनांक हा www.mahapwd.gov.in या संकेत स्थळावर पाहावयास मिळतील.

काम क्र.	कामाचे नांव	कामाची अंदाजित किंमत	कामाची किंमत (अक्षरी)	ई-निविदा प्रपत्र फी	कामाचा कालावधी
१	२	३	४	५	६
१)	झरी जामणी न्यायालय परिसरात केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत शौचालय संकुल बांधकाम करणे ता. झरी जामणी जि. यवतमाळ	७,५९,६६६/-	सात लक्ष एकोणसाठ हजार सहाशे सहासष्ट फक्त	रु. ५००/- + ९०/- (जीएसटी) = ५९०/-	१०० दिवस
२)	मारेगांव न्यायालय परिसरात केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत शौचालय संकुल बांधकाम करणे ता. मारगांव जि. यवतमाळ	७,६१,७३०/-	सात लक्ष एकसष्ट हजार सातशे तीस फक्त	५००/- + ९०/- (जीएसटी) = ५९०/-	१०० दिवस

१) कोरे निविदा प्रपत्र विक्रीचा कालावधी (डाउनलोड)	दि. ०६.११.२०२६ रोजी १०.०० वा. पासून ते १३.११.२०२६ रोजी २४.०० वा. पर्यंत
2) मोहोरबंद निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक व ठिकाण	कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, पांढरकवडा यांचे कार्यालयात दि. १६.११.२०२६ रोजी वेळ - १५.०० वा. पर्यंत
3) मोहोरबंद निविदा उघडण्याचा दिनांक व ठिकाण	कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, पांढरकवडा यांचे कार्यालयात दि. १६.११.२०२६ रोजी वेळ १६.०० वा. (शक्य झाल्यास)

टिप
1) या निविदेमधील कामांबाबत अटी व शर्ती इ. संपूर्ण माहिती http://mahatenders.gov.in संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.
2) निविदा सूचनेमध्ये काही बदल झाल्यास ते पत्रकाराद्वारे प्रकाशित करण्यात येणार नसून, होणारी दुरुस्ती अथवा बदल हा महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर ई-निविदेमध्ये पाहावयास मिळेल.
3) सदर कामाचे एक अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहे.

(शंतनू दुधाडे)
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग
पांढरकवडा

जा. क्र. ४५२१ / नि.लि. / दि. ०३/११/२०२६

जिमाका/यवत/ जाहि/ १४१ /२०२६

GOVERNMENT OF MAHARASHTRA
YAVATMAL ELECTRICAL DIVISION,
PUBLIC WORKS DEPARTMENT, YAVATMAL
TENDER NOTICE NO. 29 FOR 2026-2027

Online tenders in B-1 form are invited by Executive Engineer, Yavatmal (Electrical) Division, Public Works Division, Yavatmal on behalf of Governor of Maharashtra from qualified bidders for the following works under Manually Submission Tender procedure.

Sr. No.	Name of Work	Amount Put to Tender	E.M.D.
1	Estimate No. 260/EE/YTL/2026-27, Providing Annual fully comprehensive maintenance contract of 15 passenger cum stretcher lift (Micro processor controlled) (G+1) nos (For 3 years) at Sub-District Hospital building Umarkhed, Dist. Yavatmal.	827128/-	8300/-
2	Estimate No. 451/EE/YTL/2026-27, Providing E.I. to Grampanchayat Bhavan Village Kopra, Samaj mandir and Public toilet block rehabilitation of Deosari at Ambawan, Tq. Umarkhed, Dist. Yavatmal.	586867/-	5900/-
3	Estimate No. 452/EE/YTL/2026-27, Providing renovation to E.I. at RTO cabin and Administrative hall at RTO office Yavatmal, Dist. Yavatmal.	453612/-	4600/-
4	Estimate No. 453/EE/YTL/2026-27, Providing new accessories for CCTV system at District Jail at Yavatmal, Dist. Yavatmal.	417154/-	4200/-
5	Estimate No. 454/EE/YTL/2026-27, Providing new power supply incomer cable from meter room to panel room at District Court at Yavatmal.	417396/-	4200/-
6	Estimate No. 466/EE/YTL/2026-27, Providing AC unit and additional electrical installation for newly constructed ACB building at Yavatmal, Dist. Yavatmal.	399092/-	4000/-
7	Estimate No. 478/EE/YTL/2026-27, Providing Annual maintenance contract for AC units installed at Non-residential buildings under section-II P.W.Elect Sub-Division Yavatmal, Dist. Yavatmal.	418817/-	4200/-
8	Estimate No. 494/EE/YTL/2026-27, Providing Electrical installation to Conference hall at Administration building Ner, Tq. Ner, Dist. Yavatmal.	627611/-	6300/-
9	Estimate No. 495/EE/YTL/2026-27, Providing maintenance & repairing of Highmast at Various location under Kalamb Nagar Parishad Kalamb, Dist. Yavatmal.	384637/-	3900/-
10	Estimate No. 499/EE/YTL/2026-27, Providing renovation to E.I. Lecturer hall (A) at VNGMC building Yavatmal, Dist. Yavatmal.	325513/-	3300/-

As per G.R. No.CAT-2022/PR.KR. 50/BLD.2/Mantralaya, Mumbai, Dt. 12.05.2022 Post Qualification Criteria of the Bid Capacity is Applicable for the Bidder who have been allotted or declared L1 for 3 (Three) Works during this FINANCIAL YEAR till submission of Bid for this Work.

Tender form, conditions of contract, specifications and contract drawings be bidder must purchase the bidding documents via online mode from www.mahapwd.gov.in by clicking on "Pay PWD Online" after entering the details, payment of Rs. 590/- (Including GST) (Rupees Five Hundred Ninety Only) should be paid online using payment gateway. The fees of tender document will be non refundable. Further information regarding the work can be obtained from the above office.

TENDER SCHEDULE

Cost of Tender Form	:	Rs. 590/- Including GST
Last Date & Place of Issue of Tender From	:	From 06.11.2026 To 13.11.2026
Receipt of EMD fees, to be paid FDR/B.G. Only.	:	Earnest Money in the form of Term Deposit Receipt for a period of one year issued by a scheduled bank duly endorsed in the name of the Executive Engineer, P.W. Electrical Division Yavatmal to be submitted in Envelop No. 1.
Receipt of online Tender Document fees, to be paid online only via Payment Gateway mode Only.	:	Document Tender Fee to be paid via online mode Only.
Last Date & Place of Submitting and Opening of Technical & Financial Tender	:	Office of the Executive Engineer, P.W. (Electrical) Division, Yavatmal. Date16.11.2026 Time 14.00 Hours
Performance Security Deposit	:	If the Lowest Tenderer has quoted below the Scheduled cost by more than 1%, he should submit Performance Security Deposite in the form of Bank Guarantee/Demand Draft/F.D.R. in the office of The Executive Engineer, Public Works (Electrical) Division Yavatmal within 8 days from the opening of envelop No.2 as per Govt. Circular No. CAT/2017/C.No.08/BLD.-2, Dt. 26/11/2018.
Registration class of Contractor	:	Contractor Registered in Appropriate Class.

Lr. No./Ex. En./(Ele.)/YTL./T.C./2991/2026
Office of the Executive Engineer (Electrical) Division
Yavatmal P.W. (Electrical) Division,
P.W.D. Compound, Yavatmal. Email: elyavatmal.ee@mahapwd.gov.in
Date: 29/10/2026

Executive Engineer
Yavatmal Electrical Division
Public Works Division
Yavatmal

जिमाका/यवत/जाहि/130/2026

पान १ वरून

उद्योगाची वानवा; ...

सुरू आहे. दुसरीकडे कॅगच्या अहवालात उघड झालेली एमआयडीसींची दयनीय अवस्था आणि रोजगाराविना होणारे तरुणांचे पलायन जिल्ह्याच्या विकासावर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहे. लोहाऱ्यातील एमआयडीसीत एकमेव रेमण्डचा उद्योग वगळला तर मोठा रोजगार देणारा एकही उद्योग नाही. असंख्य भूखंड वर्षानुवर्षे ओस पडून आहेत. त्यामुळे यवतमाळातील तरुणांना मुंबई, पुण्यातच नोकरी शोधावी लागत आहे. राज्यकर्ते यावर गंभीर नाहीत. निवडणुका आल्या की, टेक्सटाईल पार्कचा मुद्दा गरम होतो. पुन्हा तो विसरला जातो.

आ. रोहित पवारांच्या दौऱ्याचा ...

शेतकरी साहेबराव करपे यांनी पत्नी व मुलाबाळांसह १८ मार्च १९८६ रोजी आत्महत्या केली होती. एकंदरीत अलिकडे जगजिवन डोंगरे यांच्या आत्महत्येने पुन्हा हा तालुका ढवळून निघाला. समाज घटनेने सुन्न झालेला असताना आणि बळीराजाच्या घरात काळी दिवाळी साजरी होत असताना, स्थानिक लोकप्रतिनिधींचे ढोंग आणि उदासीनता आता चव्हाट्यावर आली आहे. आ. रोहित पवार उद्या, ६ नोव्हेंबर रोजी डोंगरे कुटुंबाच्या सांत्वनासाठी आणि काळी दिवाळी उपक्रमात सहभागी होण्यासाठी फुलसावंगी येथे येत आहेत. या दौऱ्याची बातमी धडकताच, गेल्या ९ दिवसांपासून गाढ झोपेत असलेले स्थानिक आ. किसनराव वानखेडे यांना अचानक जाग आल्याचे पहायला मिळाले.फुलसावंगीपासून अवघ्या २५ किमी अंतरावरील आ. वानखडेंना आपल्याच मतदारसंघातील एका बळीराजाचा बळी गेल्याचे तब्बल नऊ दिवसांनंतर आठवले, याबद्दल गावकऱ्यांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. २७ ऑक्टोबर रोजी घडलेल्या या दुर्दैवी घटनेनंतर आमदारांनी ढुंकूनही पाहिले नाही. मात्र, विरोधी पक्षाचे नेते रोहित पवार स्वतः या दुःखात सहभागी व्हायला येत आहेत आणि महायुती सरकारच्या नाकर्तेपणाविरोधात काळी दिवाळी साजरी होणार आहे, हे कळताच आमदारांच्या पायाखालची वाळू सरकली.केवळ राजकीय नामुष्की टाळण्यासाठी वानखेडे यांनी गुरुवारी घाईघाईने डोंगरे कुटुंबीयांची भेट घेतल्याची घणाघाती चर्चा आज फुलसावंगीच्या कोपऱ्या-कोपऱ्यात रंगली होती. स्थानिक आमदारांची निष्क्रीयता, ९ दिवसांचा उशीर आणि राजकीय फायद्यासाठी मारलेली हजेरी यांमुळे तालुक्यातील बळीराजा कमालीचा संतप्त झाला असून, रोहित पवारांच्या या दौऱ्यामुळे स्थानिक राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे.

कृषी विभागाच्या चौकशीवरच ...

स्थळपाहणी न करता चौकशीचा अहवाल तयार होणार असेल, तर तक्रारीतील वस्तुस्थिती समोर कशी येणार, असा प्रश्नही शेतकरी उपस्थित करीत आहेत.एकीकडे कृषी विभागातील अनियमिततेविरोधात शेतकरी न्यायासाठी प्रशासनाचे दरवाजे ठोठावत आहेत, तर दुसरीकडे चौकशी प्रक्रियेतील प्रत्यक्ष पाहणीबाबतच प्रश्न निर्माण होत आहेत. त्यामुळे या प्रकरणात संबंधित दोषी अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित होणार की चौकशी केवळ कागदोपत्रीच पार पडणार, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

रेल्वे-रस्ते प्रकल्पाच्या भूसंपादनात ...

असतात. त्यातच यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयाच्या भुसंपादन विभागाच्या परिसरात काही दलाल ॲक्टिव्ह आहेत. भूसंपादनात मोबदला वाढविण्यासाठी संयुक्त मोजणीमध्ये कोरडवाहू शेतात तात्पुरते बोअरवेल, पाइपलाइन किंवा शेततळे दाखवून सातबारा आणि मोजणीशीटवर बागायत नोंद केली जाते. ज्यामुळे जमिनीचे मूल्य ५० ते १०० टक्क्यांनी वाढते. फळबागांचे बोगस मूल्यांकनही केले जाते. मोजणीच्या आधी रातोरात काही फळझाडे लावून कागदोपत्री जमीन उत्पादनक्षम दाखविली जाते. एकंदरीत वाढीव मोबदल्याच्या या प्रक्रियेत मध्यस्थांमार्फत २५ ते ४० टक्क्यांचा वाटाही ठरविल्या जात असल्याची माहिती आहे. दरम्यान मध्यंतरी भुसंपादन विभागातील एका कर्मचाऱ्याबाबत दारव्हा, दिग्रस परिसरातील भूधारक महिलेने एसीबीकडे तक्रार केली होती अशी माहिती आता पुढे आली आहे. मात्र या प्रकरणात एसीबीकडून जिल्हाधिकाऱ्यांकडे पत्रव्यवहार झाल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे सदर कर्मचारी लोकसेवक अलर्ट झाल्याची माहितीही पुढे आली.

मानव सेवा सामाजिक संस्थांचे दीपावली मिलन

यवतमाळ : दीपावली हा आनंदाचा, प्रकाशाचा उत्सव आहे. ती साजरी करण्याची स्थिती ज्यांची नसते, त्यांच्यासाठी ऐन दिवाळीत शिधावाटप करण्याची कल्पना स्तुत्य आहे. ती प्रत्यक्षात आणणाऱ्या यवतमाळातील सेवाभावी सामाजिक संस्था व त्या माध्यमातून निःस्वार्थपणे काम करणारांची संख्या पाहता इथे मानवसेनेची पंढरी अवतरल्याचे चित्र पाहायला मिळते, असे प्रतिपादन यवतमाळचे निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांनी येथे केले.

मानव सेवा सामाजिक संस्थांच्या दीपावलीमीलनप्रसंगी ते बोलत होते. येथील जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील बळीराजा चेतना बचत भवनात आयोजित कार्यक्रमाच्या व्यासपीठावर सामाजिक कार्यकर्ते सुरेश राठी, अनंत कौलगीकर, राजेश गढीकर, डॉ. नारायण मेहरे, प्रशांत बनगीनवार प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी नंददीप फाउंडेशन, सेवा समर्पण, ओवी ट्रस्ट, संकल्प फाउंडेशन, तेजस्विनी छात्रावास, नवजीवन वृद्धाश्रम, नेर, संत दोला महाराज वृद्धाश्रम, उमरी पठार, स्व. स. अ. भूत वृद्धाश्रम, यवतमाळ, जिव्हाळ्याची भिंत संस्था, घाटंजी, मातोश्री वृद्धाश्रम, आर्णी, स्नेह आधार, नेर या संस्थांना गहू, तांदूळ, दाळ व तेल इ. वस्तूंचे मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आले. याप्रसंगी सामाजिक कार्यकर्ते सुरेश राठी यांनीही मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे संचालन विवेक कवठेकर तर आभार प्रदर्शन अनंत कौलगीकर यांनी केले.

लाडक्या बहिणींचा मोर्चा फेल

केवायसीअभावी लाभांचा प्रश्न गंभीर

कळंब : शासनाची दिशाभूल करून अनेक योजणांचे लाभ घेणाऱ्या महिलांना लाडकी बहिण योजनेत शासनाकडून चाळणी लावण्यात आली. त्याविरोधात आंदोलन करणाऱ्या पक्षाचां मोर्चा पाहिजे तेवढी गर्दी न झाल्याने फेल गेला आहे.

तालुक्यात शासनाच्या अनेक योजनेत गौडबंगाल आहे. पात्र नसलेल्या अनेक लाभार्थ्यांनी दुय्यम मार्गाने अनेक योजनांचा मिळविला. बांधकाम कामगार योजनेत तर डोळ्यादेखत शासनाची लूट झाली. आयकर भरणाऱ्यांसहित काही निराधार, पीएम किसान यांसारख्या अनेक योजनांचा लाभ घेणाऱ्या महिलांनी लाडकी बहिण योजनेचा लाभ घेतला. हा संपूर्ण प्रकार शासनाच्या लक्षात आल्याने शासनाकडून या योजनेत ब्रेक लावला गेला. काही कारणास्तव केवायसी रोखली गेली. याच मुद्द्याला अनुसरून एका पक्षाने दोन दिवसाआधी धरणे आंदोलन करून मोर्चा काढला. मात्र, त्या आंदोलनाला लाभार्थ्यापेक्षा पक्षाचे नेते, कार्यकर्ते जास्त असल्याने एकंदरीत हा मोर्चा फेल गेल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.एकंदरीत दुष्काळाच्या प्रचंड झळा सोसत असलेल्या तालुक्यात शेतकरी, शेतमजूर, युवकांचे प्रश्न, वेठबिगारीसारख्या ज्वलंत प्रश्नावर आंदोलनाचा येथील राजकीय पक्षांना विसर पडला आहे.

जिल्हाधिकाऱ्यांकडे सहा गावांतील शेतकऱ्यांच्या तक्रारी, आमरण उपोषणाचाही अल्टिमेटम

राळेगावच्या कृषी विभागात अनागोंदीचा कळस

■ लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : पुसद कृषी विभागात जलयुक्तच्या कामामध्ये टक्केवारी मागितल्याचा एका कंत्राटदाराचा व्हायरल व्हीडिओ प्रचंड गाजला. त्यातच आता राळेगाव कृषी विभागही शेतकऱ्यांच्या तक्रारीने रडारवर आला आहे. या तालुक्यातील आठमुर्डी, चिखली, वेडशी, चिंचोली, पिंपळशेंडा आदी गावातील शेतकऱ्यांनी राळेगाव कृषी विभागाविरुद्ध थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे ४ नोव्हेंबरला लेखी तक्रार केली आहे. त्यासंदर्भात गृह विभागाच्या नायब तहसीलदार छाया काळे यांनी आज जिल्हा कृषी अधीक्षकांना पत्र काढून चौकशीची सूचना दिली आहे.

कृषी विभागात शेती व पीक विकासाच्या असंख्य योजना राबविल्या जातात. शेतकऱ्यांचा दैनंदीन संबंध या विभागाशी येतो. प्रामुख्याने अतिवृष्टीची नुकसान भरपाई, पीक नुकसान अनुदान, सिंचन योजना, फळबाग लागवड, पाइपलाइन, कृषी यांत्रिकीकरणाच्या योजनेवर राळेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांचा आक्षेप आहे. आठमुर्डी, चिखली, वेडशी, चिंचोली, पिंपळशेंडा या गावासह इतर गावांमध्ये कृषी विभागाच्या राबविण्यात आलेल्या योजनांमध्ये अनियमितता झाल्याचा संशय या तक्रारीत व्यक्त करण्यात आला आहे. पीकनुकसानीच्या लाभात अपात्र व्यक्तींना लाभ मिळाल्याचाही संशय व्यक्त करून अनुदान मिळवून देण्याच्या नावाखाली पैशांची मागणी होत असल्याचे या तक्रारीत नमूद आहे. अनुदानाच्या योजनांमध्ये लाभार्थ्यांची पात्रता, प्रत्यक्ष शेती, आवश्यक कागदपत्रे, अनुदान मंजुरी व प्रत्यक्ष लाभवाटपाची पडताळणी केली का, असा तक्रारीत सवाल आहे. योजनेच्या पात्रतेचे निकष पूर्ण होत नसतानाही अपात्र व्यक्तींना लाभ दिला आहे का, तसेच पात्र शेतकऱ्यांना डावलले का, याच्याही चौकशीची मागणी या शेतकऱ्यांनी केली आहे. अधिकाऱ्यांच्या उर्मट वर्तनावरही या तक्रारीत आक्षेप असून राज्याचे आदिवासी विकासमंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांच्यासह कृषीमंत्र्यांकडेही लेखी तक्रार करण्यात आली आहे. चिखली येथील शेतकरी हनुमान गाडगे व इतर शेतकऱ्यांसह वेगवेगळ्या चार प्रकारच्या तक्रारी या शेतकऱ्यांनी केल्या. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशावरून गृह विभागाच्या नायब तहसीलदार छाया काळे यांनी आज ४ नोव्हेंबरला पत्र काढून जिल्हा कृषी अधीक्षकांना चौकशीचे निर्देश दिले.

आर्णी तालुक्यातही तक्रारीचा ओघ

कृषी विभागात जलयुक्त शिवार योजनेसह कृषीविस्तार व तंत्रज्ञान कार्यक्रम (आत्मा), फळबाग योजना, आदर्श गाव, कृषी सिंचाई योजना, यांत्रिकीकरण, तृणधान्य, गळीतधान्य विकास यासह असंख्य योजना राबविल्या जातात. सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन देण्याच्या योजना आहेत. मात्र, अनेक योजनांमध्ये गैरप्रकारांची मालिका सुरू आहे. आर्णी तालुक्यातील शेतकऱ्याने केलेल्या तक्रारीवरून वाशिम कृषी विभागाच्या उपविभागीय कृषी अधिकाऱ्याकडे चौकशी सोपविण्यात आली. मात्र, आपल्याच विभागातील अधिकाऱ्यांना वाचविण्याचे प्रयत्न केले जात आहे.

मसाल्याची ३८०० रुपये तर खाण्याची साडेचार हजार रुपये किलो

मसाल्याची राणी विलायची महागली

■ किशोर जुननकर

यवतमाळ : सध्या दिवाळीचा सण सर्वत्र उत्साहात साजरा होत असतानाच या सणानिमित्त प्रत्येक घरामध्ये फराळांच्या वस्तू तयार होत असतात. यातही आवश्यक असणारी मसाल्याची विलायची याचा त्यामध्ये वापर केला जातो सध्या या मसाल्याच्या विलायची चा दर आणि खाण्याच्या विलायचीचा दर प्रचंड वाढला आहे, अशी माहिती किराणा व्यवसायिक उदय बदनोरे यांनी दिली.

स्वयंपाक घरात मसाल्यांना आणि विशेषत: मसाल्याच्या राणीला अनन्य साधारण महत्त्व आहे. मात्र अलीकडच्या काळात मसाल्यांच्या दरात झालेल्या भरमसाठ वाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला चांगलीच कात्री लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे. मसाल्यामधील अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी विलायची मागील महिन्याभरात तब्बल ७०० ते हजार रुपयांनी महागली असून स्थानिक बाजारपेठेत विलायचीचा दर प्रचंड वाढला आहे. मसाल्याच्या विलायची दर हा प्रतवारीप्रमाणे ३००० ते ३८०० रुपये प्रतिकिलो झाला आहे. तर खाण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या विलायची दर साडेचार हजार रुपये किलो झाला आहे.



दोन्ही प्रकारच्या विलायचीची किचनमध्ये मोठ्या प्रमाणात गरज असते. हिरवी विलायची ही पानदानातील अति महत्त्वाचा आणि प्रतिष्ठेचा घटक मानला जातो. पानदानात विलायची नसेल तर त्या पानदानाला शून्य महत्व प्राप्त होते. याशिवाय श्रीखंड, बासुंदी, खीर यामध्ये त्याचा वापर करतात. दोन्ही प्रकारच्या विलायचीचे दर अधिक वाढल्यामुळे हॉटेल, मिठाई व्यावसायिक यांच्या बजेटमध्येही परिणाम झाला आहे. स्वीट मार्टमधून विकल्या जाणाऱ्या वस्तूंच्या किमतीही त्याच तुलनेत एकाच वेळी वाढले आहेत. मागील वर्षाला साखरेचा भाव ४८ रुपये किलो होता तर आता साखरेचा भाव ७० रुपये किलो आहे. तर मागील वर्षी विलायची २७०० ते ३००० रुपये किलो होती ती आता साडेचार हजारावर गेली. त्यामुळे हॉटेल व्यवसायिक, स्वीट मार्ट मालक यांचे बजेट पूर्णपणे कोलमडले आहे. तर याचाच फटका दिवाळी फराळांच्या वस्तूची खरेदी करणाऱ्या ग्राहकांनाही बसला आहे. ज्या ठिकाणी किलो दोन किलो वस्तूंची खरेदी केल्या जात होती तिथे आता अर्धा किलो वर ग्राहकाला आहे. दरवाढ होण्यामागील कारणे सांगताना उदय बदनोरे यांनी सांगितले की, उत्पन्नात झालेली घट आणि वाढलेली मागणी यामुळे दरामध्ये वाढ झाली. दक्षिण भारतातील राज्यांमध्ये विलायचीचे प्रामुख्याने उत्पादन घेतले जाते. तेथील हवामानातील बदलांमुळे उत्पादनावर विपरीत परिणाम झाला आहे. बाजारातील आवक घटल्यामुळे आणि मागणी कायम वाढत असल्याने दरामध्ये तेजी पाहावयास मिळत आहे. दोन्ही प्रकारच्या विलायची खरेदी कुठलाच ग्राहक मोठ्या प्रमाणात करत नाही. आता तर भाव तेजीत असल्याने सोन्यासारखे एक तोळा द्या, असे ग्राहक दुकानदाराला सांगतात. तोळ्याच्या भावात खरेदी करणाऱ्यांची संख्या अधिक झाली आहे. यातही प्रतीची तुलना आणि तपासणी केल्या जाते. आकार, रंग, सुगंध आणि चव यावर दर ठरतात, असे हे बदनोरे यांनी स्पष्ट केले.

तिकीट दरवाढीवर दोन रुपये स्वच्छता अधिभार

५५ लाख प्रवाशांच्या मानगुटीवर एक कोटीचा भार



संग्रहित

■ किशोर जुननकर

यवतमाळ : लालपरीने प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य प्रवाशांच्या खिशाला पुन्हा एकदा कात्री लागली आहे. एसटी महामंडळाने स्वच्छता अधिभार दोन रुपये प्रत्येक प्रवाशाच्या तिकिटावर लावला असून, आधीच महागडा झालेला एसटीचा प्रवास अधिकच महाग झालेला आहे. अशी प्रतिक्रिया प्रवाशांकडून ऐकायला मिळत आहे. एसटी महामंडळ सातत्याने नुकसानीत असल्याची ओरड होत असून, वेगवेगळ्या मार्गाने प्रवाशांच्या खिशातून पैसे काढण्यासाठी पुढारली आहे. पूर्वी एसटी महामंडळ तिकिटाची दरवाढ ही साधारणतः दोन ते तीन वर्षानंतर एकदा करत होती. डिझेलचे दर वाढले ही एसटीच्या तिकिटात किमान ५ टक्के दरवाढ होत होती. आता मात्र ही दरवाढ टप्प्याटप्प्याने केल्या जात आहे. आणि याचा फटका प्रवाशांना बसत आहे.

दिवाळीचा सीझन आला की, एसटी ही दहा टक्के दरवाढ करून टाकते. खासगी बस ज्या पद्धतीने दरवाढ करते, तीच पद्धत आता एसटी ही वापरू लागली आहे. यातही स्वच्छतेच्या नावाखाली दोन रुपयाचा अधिकार घेतल्या जात असल्याने तिजोरीत दररोज एक कोटी दहा लाख रुपये जमा होत आहे महिन्याला ही रक्कम ३० कोटींपेक्षा अधिक होत आहे. स्वच्छतेच्या नावाखाली दोन रुपये अधिभार घेतल्या जात असला तरी, खरंच बस स्थानक आणि परिसर सध्याच्या स्थितीत स्वच्छ आहे का? हा प्रश्न निर्माण झाला आहे. राज्यात एकूण ५६४ बस स्थानके असून तेथे स्वच्छतागृहाची जबाबदारी विविध संस्थांकडे विभागलेली आहे. एस टी महामंडळ अंतर्गत असलेल्या स्थानकामधील २६७ स्वच्छतागृहे, सुलभ इंटरनॅशनल अंतर्गत १०७ स्थानामधील स्वच्छतागृह आणि वाल्मिकी समाज सोसायटीकडे असलेल्या ७७ स्थानकांमधील स्वच्छतागृह याशिवाय ११३ स्थानकांमधील स्वच्छतागृह बाह्य संस्थांकडे स्वच्छतेसाठी देण्यात आलेले आहे. सुरुवातीला स्वच्छतागृहाचा वापर करण्यासाठी प्रत्येक बस स्थानकावर पैसे मोजावे लागत होते. यातूनच स्वच्छतागृहचा खर्च केला जात होता. आता प्रवाशांना मोफत स्वच्छतागृह उपलब्ध करून देण्यासाठी तिकिटांवर दोन रुपये अतिरिक्त अधिभार लावला. मात्र, त्यातून फार काही निष्पन्न झाले असे म्हणता येत नाही. अजूनही काही बसस्थानकावर पाच रुपये घेतल्या जातात, असा आरोप अनेक ठिकाणच्या बसस्थानकावर प्रवासी करताना दिसतात.

एसटी महामंडळाने ६५ वर्षावरील व्यक्ती आणि महिलांसाठी सवलतीचे एनसीएमसी हे कार्ड काढले. एजंटमार्फत काढलेल्या या कार्डमध्ये २५० रुपये घेतल्या जात होते. यातील २०० रुपये एसटी महामंडळ कडे जाते. प्रवास करताना मात्र प्रवाशांच्या वाट्याला १९६ रुपये येतात. तेवढ्या पैशात त्यांना आपला प्रवास करावा लागतो. म्हणजे यातूनही दोन टक्के कपात एसटी महामंडळाने करून तिजोरीत भर घातली आहे.

संस्थेच्या नियमबाह्य कारभाराने प्रश्नचिन्ह


'त्या' प्राध्यापकाची दिवाळी अंधारात

■ लोकसूत्र प्रतिनिधी

कळंब : केवळ लक्ष्मीदर्शनांकरिता अनागोंदीचा कळस गाठून विद्यार्थी, प्राध्यापकांची मुस्कटदाबी करीत असलेल्या असलेल्या राळेगाव रोडवरील 'त्या' महाविद्यालयाच्या नियमबाह्य कार्यपद्धतिचा तेथीलच एक कार्यकुशल प्राध्यापक 'शिकार'ठरला आहे. गेल्या तीन वर्षांपासून पगाराच्या प्रतीक्षेत असलेल्या 'त्या' प्राध्यापकाची यंदाचीही दिवाळी महाविद्यालय प्रशासनाच्या घोडचुकीने काळी होण्याच्या मार्गांवर आहे.

तालुक्यात दुष्काळाची कळा सोसणाऱ्या गोरगरीब विद्यार्थ्यांसह, शासनाची दिशाभूल करून गलेगठ्ठ माया जमवलेल्या त्या संस्थेला न्यायालयाशिवाय कोणाची भीती उरलेली नाही. आधी मुजोऱ्या नंतर न्यायालयाच्या आदेशानुसार तक्रारकर्त्यांच्या पायापोटी पडण्याची सवयच जणु त्या महाविद्यालयाला जडलेली आहे. अनेकांनी यां महाविद्यालयाला न्यायालयात खेचून तेथील प्राचार्याची जिरवल्याचे अंतिम सत्य आहे. मात्र, मागील तीन वर्षाअगोदर 'त्या' महाविद्यालयाच्या एका प्राध्यापकाणे खाजगी कारणास्तव राजीनामा दिला होता. मात्र कौटुंबिक दबावातुन त्या प्राध्यापकाणे राजीनाम्याचा निर्णय मागे घेत अवघ्या एका महिन्यातच पुन्हा तेच महाविद्यालय जवळ केले. मात्र त्यांचा हा निर्णय महाविद्यालयाला पचेनासा झाला. जणू महाविद्यालय त्या प्राध्यापकाच्या राजीनाम्याची वाट पाहत असल्यागत त्या महाविद्यालयाने राजीनामा मंजूर करून घेतला.राजीनामा मंजूर करून घेण्यासाठी नियमानुसार ३ महिन्याचा कालावधी असताना अवघ्या काही दिवसातच हा मंजूर करून त्या प्राध्यापकाला थेट पगार बिलावरून काढून टाकले. अन्‌रुजु करून घेण्यास टाळाटाळ केली. मात्र त्या प्राध्यापकाणे न्यायालयात धाव घेताच महाविद्यालय प्रशासन थंडगार झाले, मात्र या घटनेला तीन वर्ष उलटूनही त्या प्राध्यापकाची झालेली गोची सुटलेली नाही. त्यामुळे त्यांचा राजीनामा स्वीकारण्याची व त्यांना पगार बिलावरून काढून टाकण्याची घाई त्या महाविद्यालयाने का केली हे प्रश्न अनुत्तरीत आहे. या कारणाने तीन वर्षापासुन आजवर ही तो प्राध्यापक विनापगारी असून त्यांची अंदाचीही दिवाळी काळी होण्याचा मार्गांवर आहे. त्यामुळे या महाविद्यालयाच्या हेतूवरच प्रश्नचिन्ह निर्माण होऊन या महाविद्यालयाचा उगम शिक्षणाकरिता झालेला आहे कि विद्यार्थी व प्राध्यापकांच्या जिरवाजिरवी साठी! असा प्रश्न सार्वत्रिक विचारला जाऊ लागला आहे.

लोखंडी शटर तोडून दारूची चोरी



आर्णी : आर्णी पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या जवळा येथे गुरुदत्त तायडे वय ३८ यांचे जवळा येथे अमित वाईन बार असून चोरट्यांनी बारच्या मागील शटर आणि लाकडी दार तोडून बार मधील देशी, विदेशी दारू तसेच नगदी रुपये असा एक लाख ६८ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला ही चोरी तीन ते चार नोव्हेंबर च्या मध्यरात्री झाल्याचे तायडे यांनी आपल्या तक्रारीत नमूद केले आहे. याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.

लाखोंचा डीसी केबल चोरी

यवतमाळ : अज्ञात चोरट्याने मांजर्डा येथील सोलर प्लांटवरील एक लाख तीन हजार ४६० रुपयांचा केबल चोरून नेला. ही घटना ३१ ऑक्टोबरच्या रात्री ९ ते १ नोव्हेंबरच्या सकाळी ६ वाजताच्या दरम्यान घडली. नितीन सीताराम पवार (३३) रा. मांजर्डा असे फिर्यादीचे नाव आहे. आदित्य बिर्ला रिनेबल ग्रीन पॉवर प्रा. लि. सोलर प्लांट, मांजर्डा येथे अज्ञात व्यक्तीने एकूण चार हजार ९५६ मीटर जुना वापरता डीसी कॉपर केबल यापैकी दोन हजार मीटर केबल प्रत्येकी १ मीटरची किंमत अंदाजे ३५ रुपये याप्रमाणे ७० हजारांचा केबल चोरी करून तसेच दोन हजार ९५६ मीटर केबलचे तुकडे कापून अंदाजे एक लाख तीन हजार ४६० रुपयांचे नुकसान केले. या प्रकरणी वडगाव जंगल पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.

यंदाही सावळ्यात ९४ वा कीर्तन महोत्सव

९ नोव्हेंबरपासून भक्तिमय वातावरणात प्रारंभ!

■ लोकसूत्र प्रतिनिधी

यवतमाळ : नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी ।। या तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्यासाठी दारव्हा तालुक्यातील सावळ्यात नको ब्रम्हज्ञान आत्मस्थिती भाव, मी भक्त तू देव ऐसे करी। ही प्रार्थना करणारा कीर्तन महोत्सव होत आहे. हरीकथा सुखाचे मूळ हे दाखविणारा आध्यात्मिक महोत्सव सुखाची पर्वणी यंदाच्याही दिवाळीत घेऊन येणार आहे.



वारकरी संप्रदायाची थोर परंपरा, संतांची प्रासादिक वाणी आणि भक्तिरसाने न्हाऊन निघणारे वातावरण... असाच काहीसा दिव्य आणि मंगलमय सोहळा दारव्हा तालुक्यातील सावळा येथे अनुभवायला मिळणार आहे. श्री विठ्ठलाच्या कृपेने आणि वै. गु. ह. भ. प. अमृत महाराज नरखेडकर, नाना महाराज कोठेकर व रामभाऊ महाराज जावळे यांच्या पावन कृपाप्रसादाने, तसेच ह.भ.प. दत्तारामजी पाटील सावळेकर यांच्या प्रेरणेने सालाबादप्रमाणे याही वर्षी सावळा येथे '९४ व्या कीर्तन महोत्सवाचे' भव्य आणि दिमाखदार आयोजन केले आहे.

संतांनी कीर्तनाचे महत्त्व सांगताना म्हटले आहे.

'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी ।। संत नामदेवांनी कीर्तनातून ज्ञानाचा दीप लावण्याचे मर्म सांगितले. तर

कीर्तन हे ब्रह्मविद्या ज्ञानपीठ। तेथे प्रकटे पांडुरंग साक्षात ।।'' संत ज्ञानेश्वर माऊली म्हणतात.

गाऊ कीर्तन धरू प्रेमसुख। तुटतील दुःखाचे पारखे ।।'' संत चोखामेळा यांनीही दुःखाचे डोंगर दूर करण्याचा मार्ग कीर्तनात असल्याचे सांगितले. या पावन कीर्तन परंपरेचा जागर सावळा नगरीत दोन दिवस रंगणार आहे. या धार्मिक व आध्यात्मिक महोत्सवात महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार आणि भागवताचार्यांच्या वाणीतून विचारांची अमृतवृष्टी होणार आहे. कीर्तन ही केवळ एक कला नसून ती आत्मशुद्धी आणि ईश्वराशी अनुसंधान साधणारी भक्तीची सर्वोच्च पायरी आहे. तुकोबांच्या शब्दांत सांगायचे तर

''आम्हा सापडले नामियाचे धन। करू कीर्तन रात्रंदिवस ।।''

या भक्तिमय सोहळ्याचा, नामसंकीर्तनाचा आणि चक्रीभजनाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक ठाकरे परिवार (सावळा) यांनी केले आहे.

कार्यक्रमाची रूपरेषा

सोमवार,९ नोव्हेंबरला रात्री ९.०० वाजता महोत्सवाच्या प्रथम पुष्पाचे कीर्तन निरूपण प्रसिद्ध कीर्तनकार ह. भ. प. भीमराव महाराज कोठे (हिंगणा) यांच्या सुश्राव्य व ज्ञानवर्धक वाणीतून संपन्न होईल.मंगळवारी १० नोव्हेंबरला दुपारी ३.०० वाजता स्वर आणि भक्तीचा अनोखा मेळ साधणारा 'सांप्रदायिक चक्रीभजनाचा कार्यक्रम' आयोजित केला आहे. यामध्ये स्थानिक व पंचक्रोशीतील भजनी मंडळे सहभागी होऊन टाळ-मृदुंगाच्या गजरात आसमंत दुमदुमवून टाकतील. तर रात्री ९.०० वाजता महोत्सवाच्या मुख्य व उत्तररंगाचे कीर्तन भागवताचार्य ह. भ. प. लक्ष्मण महाराज (शेडगाव, जि. वर्धा) यांच्या प्रासादिक आणि ओघवत्या शैलीत पार पडेल.

हे पत्रक मालक, प्रकाशक, मुद्रक राहुल माणिकराव ठाकरे यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट नागपूर ४४००१८ येथे मुद्रित करून दै. लोकसूत्र 'शिवभवन' दत्तचौक यवतमाळ-४४५००१ येथे प्रकाशित केले. कार्यकारी संपादक केशव मारोतराव सवळकर (संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) (सर्व वाद यवतमाळ न्यायालया अंतर्गत) ई-मेल : loksutra@gmail.com